नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २५२ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### ऐतिहासिक व दुर्मिळ बायबलची प्रत

अहिल्यानगर (स. गांवकरी) : स्त्रीशिक्षणाच्या अग्रदूत, विदुषी आणि समाजसुधारक पंडिता रमाबाई यांनी अनुवादित केलेल्या व सन १९२४ मध्ये प्रकाशित झालेली बायबलची दुर्मिळ प्रत येथील ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्राकडे जतनासाठी देणगी स्वरुपात जमा करण्यात आली आहे. पंडिता रमाबाईंची विद्वत्ता, त्यांचे भाषांतर कार्य तसेच स्त्रीशिक्षण, सामाजिक सुधारणांच्या कार्याची साक्ष देणारी ही ऐतिहासिक प्रत संग्रहालयाच्या ठेव्यांमध्ये महत्त्वाची भर ठरणार आहे. सावेडी येथील रविंद्र प्रेमचंद ठोंबरे यांनी ही दुर्मिळ प्रत संग्रहालयाचे अभिरक्षक डॉ. संतोष यादव यांच्याकडे देणगी म्हणून सुपूर्द केली. रविंद्र ठोंबरे यांच्या माहितीनुसार ही प्रत पंडिता रमाबाई यांनी भाषांतरित केलेल्या पहिल्या शंभर प्रतींपैकी एक व सन १९२४ मध्ये प्रकाशित झालेली आहे. ही प्रत श्रीमती किरण साळवी (सोलापूर) यांच्या नावाने जतन करून ठेवावी, अशी विनंतीही देणगीदारांनी केली आहे.

### दिवाळीत ग्राहकांना कांदा रडविणार?

मुंबई (स. गांवकरी) : देशात गतवर्षी सुमारे ३०७ लाख टन कांदा उत्पादन होऊनही उन्हाळी कांदा खराब होण्याचे प्रमाण ३० टक्क्यांवर गेल्यामुळे आणि मोसमी पावसाने ओढ दिल्याने कांद्याच्या दराने उसळी घेतली आहे. त्यातच ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये बाजारात येणाऱ्या आंध्र प्रदेश, कर्नाटकातील कांद्याची आवक अद्याप सुरू न झाल्याने नोव्हेंबरच्या सुरुवातीस खरीप कांद्याची आवक सुरू होईपर्यंत कांदा दरात तेजी राहील. थोडक्यात यंदा दिवाळीत कांदा ग्राहकांना चांगलाच रडविणार आहे. गतवर्षी देशात सरासरी ३०७ लाख टन कांदा उत्पादन झाले होते. एकूण कांदा उत्पादनात रब्बी, उन्हाळी कांद्याचे प्रमाण ७५ टक्के, पूर्व हंगामी खरीप हंगामातील १० ते १२ टक्के आणि उशिराच्या खरिपातील कांद्याचा १० ते १२ टक्के हिस्सा असतो. उन्हाळी कांद्याचा दर्जा चांगला असल्यामुळे साठवणूक केली जाते. यंदा उन्हाळी कांदा काढणीच्या वेळी अतिवृष्टी, अवकाळी, गारपिटीचा फटका बसल्यामुळे पावसात भिजला. त्यामुळे चाळींमध्ये साठवलेल्या कांद्याच्या वजनात घट येण्यासह कांदा सडणे, कोंब येण्याचे प्रकार वाढले आहेत. परिणामी साठवलेल्या कांद्यापैकी ३० ते ३५ टक्के कांद्याचे नुकसान झाले आहे.

### अहिल्यानगरमध्ये दुसऱ्या हप्त्यात ४१२.४८ कोटी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील दुसरा हप्त्यामध्ये जिल्ह्यातील ४१ हजार १७३ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ४१२ कोटी ४८ लाख ८८ हजार ५३२ रक्कम वर्ग करण्यात आली आहे. पहिला व दुसऱ्या अशा दोन हप्त्यात आतापर्यंत जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या १ लाख २ हजार ५६३ शेतकऱ्यांच्या खात्यावर ९७६ कोटी तर राष्ट्रीय व व्यापारी बँकांच्या १२ हजार ६५२ शेतकऱ्यांच्या खात्यावर १३८ कोटी असे एकूण अहिल्यानगर जिल्ह्यातील १ लाख १५ हजार २१५ शेतकऱ्यांच्या खात्यावर १ हजार ११४ कोटी रुपये जमा झालेल आहेत. सहकार खात्याचे जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी ही माहिती दिली. जिल्हा सहकारी बँकेचे १ लाख २ हजार ५६३ शेतकरी कर्जमुक्त झाले असून त्यांच्या खात्यावर ९७५ कोटी ९८ लाख ४८ हजार ६३१ कोटी रक्कम वर्ग झाली आहे. कर्जमुक्ती योजनेचा पहिला हप्ता ७ ऑगस्टला जाहीर झाला होता. त्यात जिल्हा बँकेचे ६६ हजार १३९ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला होता तर ६२७ कोटी ४७ लाख २६ हजार ५६२ रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली होती.

# निधिवाटपात भेदभाव

## जिल्हा नियोजनमधून निधी मिळणार, मुख्यमंत्री फडणवीस यांचे आश्वासन

मुंबई : (स. गांवकरी)



जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीडिसी) निधीवाटपात सत्ताधारी आणि विरोधक असा भेदभाव न करता विरोधी पक्षाच्या खासदारांनाही निधी उपलब्ध करून दिला जाईल असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिले. सह्याद्री अतिथीगृहावर विरोधी पक्षाच्या खासदारांसोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेतली. बैठकीला काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि उबाठा गटाचे खासदार उपस्थित होते. मतदारसंघातील विकासकामांसाठी खासदारांना निधी मिळावा, तसेच केंद्राच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत समन्वयासाठी दिशा समित्यांच्या बैठका नियमित घ्याव्यात, अशी मागणी विरोधी पक्षाच्या खासदारांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. त्यावर आवश्यक सूचना देऊन प्रश्न सोडविण्याचे आश्वासन फडणवीस यांनी दिले. कोल्हापूरचे खासदार शाहू छत्रपती, सुप्रिया सुळे, अरविंद सावंत यांच्यासह विरोधी पक्षाच्या खासदारांनी आपापल्या मतदारसंघांतील प्रश्न मांडले. केंद्राकडे प्रलंबित असलेल्या प्रकल्पांसाठी निधी मिळविण्यापासून ते मुंबईतील विकासकामांपर्यंत विविध विषयांवर बैठकीत चर्चा झाली. गेल्या काही वर्षांपासून मुख्यमंत्री आणि राज्यातील विरोधी पक्षांच्या खासदारांमध्ये अशा स्वरूपाची बैठक झाली नव्हती. त्यामुळे केंद्राकडे प्रलंबित असलेल्या प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी आणि त्यासाठी केंद्राकडून निधी मिळविण्याच्या प्रक्रियेत राज्य सरकारने खासदारांशी समन्वय साधावा, अशी मागणी करण्यात आली. राज्याचे प्रतिनिधी म्हणून केंद्राकडून निधी मिळविण्यासाठी खासदारही पाठपुरावा करू शकतात; मात्र त्यासाठी प्रकल्पांची माहिती आणि राज्य सरकारची भूमिका त्यांना कळणे आवश्यक आहे, असे खासदारांनी निदर्शनास आणून दिले.

केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी असलेल्या दिशा समित्यांचा मुद्दाही बैठकीत उपस्थित झाला. मुद्रा, स्टँड अप, स्टार्ट अप, कौशल्य विकास, ग्रामीण रस्ते, पाणी, वीज आणि शेतकरी योजनांसाठी केंद्राकडून मिळणाऱ्या निधीचा विनियोग कसा झाला, याचा आढावा घेण्याचे काम या समित्यांमार्फत केले जाते. संबंधित जिल्ह्यातील ज्येष्ठ खासदार या समितीचे अध्यक्ष असतात. मात्र, मुंबई शहरातील दिशा समितीची बैठक गेल्या दोन वर्षांपासून झालेली नसल्याची तक्रार खासदारांनी केली. यावर दिशा समितीची बैठक लवकरच घेण्यात येईल, असे फडणवीस यांनी सांगितले. दिल्लीतील महाराष्ट्र सदनातील एका अधिकाऱ्यामार्फत खासदारांशी समन्वय साधण्याची व्यवस्थाही करण्यात येणार आहे. केंद्राकडील प्रलंबित प्रश्न, विविध योजनांचा निधी आणि अन्य विषयांवर हा अधिकारी खासदारांशी समन्वय साधेल, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

### आरोप

जिल्हा नियोजनाच्या निधीवाटपातील भेदभावाचा मुद्दाही खासदारांनी उपस्थित केला. विद्यमान खासदारांना निधी देण्याआधी सत्ताधारी पक्षातील माजी नगरसेवक आणि माजी खासदारांना निधी देण्यात आल्याची तक्रार करण्यात आली. खासदार निधीच्या नियमांनुसार रस्ते किंवा चाळींच्या दुरुस्तीसारख्या कामांसाठी निधी देता येत नसल्याने नागरिकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी डीपीडिसीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली. त्यावर खासदारांना नियमानुसार निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. मुंबईतील विकास प्रकल्पांच्या नियोजनात स्थानिक खासदारांना विश्वासात घेतले जात नसल्याचा मुद्दा अरविंद सावंत यांनी मांडला. नवीन पूल, मोनोरेल किंवा अन्य वाहतूक प्रकल्प उभारताना त्याचा वाहतुकीवर होणारा परिणाम आणि निर्माण होणारी कोंडी याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा केली पाहिजे. स्थानिक परिस्थितीची माहिती असल्याने खासदारांकडून काही सूचना मिळू शकतात, त्या स्वीकारायच्या की नाहीत हा निर्णय सरकारचा असला तरी लोकप्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे, असे सावंत यांनी सांगितले.

# गोवा मुक्तिसंग्रामातील हुतात्म्यांचा इतिहास जतन करणार



सावंतवाडी : (स. गांवकरी)

गोव्याच्या मुक्तिसंग्रामात प्राणांची आहुती देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा इतिहासात योग्य सन्मान झाला पाहिजे. गोवा मुक्तीसाठी बलिदान देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांची सखोल माहिती संकलित करून त्यांची नावे निश्चित करावीत, असे आवाहन केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना केले. गोवा पत्रादेवी येथील पुनर्रचित हुतात्मा स्मृती स्मारकाचे लोकार्पण केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या सोहळ्यात त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांना पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली, तसेच स्मारक परिसरात वृक्षारोपण केले.

या प्रसंगी राजनाथ सिंह यांच्या हस्ते 'मार्टर्स ऑफ गोवा' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आणि हुतात्म्यांचे शौर्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी हे पुस्तक अत्यंत महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्वातंत्र्यासाठी रक्त सांडलेल्या एकाही वीराचे नाव इतिहासातून वगळले जाऊ नये; सर्व हुतात्म्यांची नावे दगडावर कोरून त्यांचे कायमस्वरूपी स्मरण केले जावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास संबोधित करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी गोव्याच्या मुक्तिसंग्रामाचा इतिहास केवळ १९४६ पासूनचा नसून, त्यापूर्वी अनेक दशकांपासून पोर्तुगीज राजवटीविरोधात संघर्ष सुरू असल्याचे स्पष्ट केले. यात कुंकळ्ळीचा ऐतिहासिक उठाव हा प्रतिकाराचा एक मुख्य अध्याय होता, असे त्यांनी अधोरेखित केले. या ऐतिहासिक कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक, राज्यसभा खासदार सदानंद तानावडे, पर्यटनमंत्री रोहन खंवटे, सार्वजनिक बांधकाममंत्री दिगंबर कामत, गोवा-दमण-दीव स्वातंत्र्यसैनिक संघटनेचे अध्यक्ष रोहिदास देसाई यांच्यासह अनेक मंत्री, आमदार, प्रशासकीय अधिकारी आणि स्वातंत्र्यसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुपर हायवे उभारण्याच्या घोषणा करणारे आता एका लेनवर आलेत

## मुंबई-गोवा महामार्गाच्या कामावर आदित्य ठाकरेंची टीका

अलिबाग : (स. गांवकरी)



देशात सुपर हायवे उभारण्याच्या घोषणा करणारे आता एका लेनवर आले आहेत. गेल्या दहा वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण करता आलेले नाही. प्रत्येक वेळी काम पूर्ण करण्याची आश्वासने आणि नव्या मुदती दिल्या जातात; मात्र प्रत्यक्षात काम पूर्ण होत नाही. माणगाव आणि इंदापूर येथील बाह्यवळण मार्गाची एक मार्गिका गणेशोत्सवापूर्वी सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले असले, तरी ते पूर्ण होण्याची शक्यता नाही. त्यामुळे यंदाही गणेशभक्तांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. किमान माणगाव-इंदापूर परिसरातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केली. मुंबई-गोवा महामार्गाच्या पाहणीनंतर माध्यमांशी बोलताना आदित्य ठाकरे यांनी महामार्गाच्या कामावरून केंद्र सरकार आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणावर टीका केली. महामार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रत्येक वेळी नवी मुदत दिली जाते. मग कामे पूर्ण का होत नाहीत? गेली दहा वर्षे काय करत होते, असा सवाल त्यांनी केला.

# ५ लाख २५ हजार ५११ भाविकांचे "वंदे मातरम्"सामूहिक गायन

## नवा विश्वविक्रम प्रस्थापित

शिर्डी : (स. गांवकरी)




महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथील श्री क्षेत्र धनगरवाडी येथे संत योगीराज सद्गुरु श्री गंगागिरी महाराज यांच्या १७९व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. २५ ऑगस्ट २०२६ रोजी श्रीक्षेत्र सरला बेटचे विद्यमान मठाधिपती महंत श्री रामगिरी महाराज यांच्या आयोजनाखाली एकूण ५ लाख २५ हजार ५११ भाविकांनी एकाच वेळी "वंदे मातरम्"चे सामूहिक गायन करून नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला. "वंदे मातरम्"चे एकाच वेळी सर्वाधिक लोकांनी केलेल्या सामूहिक गायनाचा यापूर्वीचा विश्वविक्रम १ लाख ४ हजार ६३७ सहभागींच्या नावावर होता. हा विक्रम १२ जानेवारी २०१० रोजी पुणे येथे द आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनने आयोजित केलेल्या "अंतर्नाद" या संगीत कार्यक्रमात नोंदविण्यात आला होता. या विश्वविक्रमाचे प्रमाणपत्र श्रीक्षेत्र सरला बेटचे मठाधिपती महंत श्री रामगिरी महाराज यांना विनर्स बुक ऑफ रेकॉर्ड्स वर्ल्डचे अध्यक्ष आणि १८४ विश्वविक्रम करणारे पहिले भारतीय डॉ. दीपक हरके, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

मिस इंडिया आणि विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या चेअरमन डॉ. ईशा अग्रवाल यांनीही सरला बेटचे मठाधिपती महंत श्री रामगिरी महाराज यांचे या ऐतिहासिक कामगिरीबद्दल अभिनंदन केले.

या कार्यक्रमास अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यामध्ये श्रीक्षेत्र सरला बेटचे विश्वस्त व मार्गदर्शक मधु महाराज, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, आमदार विवेक कोल्हे, कोपरगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार आशुतोष अशोकराव काळे, वैजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार रमेश बोरनारे, संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळे, नेवासा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार विठ्ठल लंघे तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचा समावेश होता.

# एफडीएच्या कारवायांची घरगुती खाणावळींना धास्ती

## परवान्याच्या नियमांबाबत अनभिज्ञता

अलिबाग : (स. गांवकरी)




रायगडच्या पर्यटनाला समुद्रकिनारे, किल्ले आणि निसर्गसौंदर्याची जोड असली तरी येथील अस्सल कोकणी खाद्यसंस्कृती हे पर्यटकांसाठी तितकेच मोठे आकर्षण आहे. घरगुती पद्धतीच्या जेवणासाठी पर्यटक आवर्जून स्थानिक खाणावळींचा शोध घेतात. मात्र, तुकाराम मुंढे यांच्या अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) सुरू असलेल्या परवाना तपासणीमुळे अल्प भांडवलावर व्यवसाय करणाऱ्या घरगुती खाणावळचालकांमध्ये चिंता वाढली आहे.

अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, हरिहरेश्वर, काशीद, मांडवा, दिघी आदी पर्यटनस्थळांच्या परिसरात अनेक स्थानिकांनी घरातूनच खाणावळी सुरू केल्या आहेत. काही व्यवसाय वर्षभर सुरू असतात, निवास आणि न्याहारी केंद्र अनेक ठिकाणी कार्यरत आहेत, यातून पर्यटन हंगामात अनेक कुटुंब या माध्यमातून अतिरिक्त उत्पन्न मिळवतात. अनेक कुटुंबांसाठी हा व्यवसाय उदरनिर्वाहाचे साधन असून, महिलांनाही त्यातून रोजगार व आर्थिक उत्पन्न मिळत आहे. मोठ्या हॉटेल्सच्या तुलनेत स्थानिक घरगुती खाणावळीत मिळणाऱ्या ताज्या मासळीच्या पदार्थांना आणि पारंपरिक कोकणी जेवणाला पर्यटकांची विशेष पसंती असते. त्यामुळे या खाणावळी केवळ स्थानिक व्यवसाय न राहता रायगडच्या पर्यटन व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग बनल्या आहेत.

अन्न व्यवसायासाठी आवश्यक परवाना घेणे बंधनकारक असले तरी अनेक छोट्या व्यावसायिकांना परवाना प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि नियमांची पुरेशी माहिती नसल्याचे तपासणीत पुढे येत आहे. त्यामुळे कारवाईच्या भीतीने काही खानावळचालक व्यवसाय बंद करण्याचा विचार करत आहेत. विशेषतः घरातून किंवा अत्यल्प भांडवलावर व्यवसाय सुरू करणाऱ्या व्यावसायिकांसाठी परवाना प्रक्रिया आणि नियमांची पूर्तता करणे आव्हानात्मक ठरत असल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. काशीद परिसरातील व्यावसायिकांनी त्यामुळे कारवाईसोबतच मार्गदर्शन करण्याची मागणी केली आहे. अन्नपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता आणि ग्राहकांचे आरोग्य यासाठी अन्न औषध प्रशासनाची तपासणी आवश्यक आहे. मात्र, मोठ्या आस्थापनांप्रमाणेच छोट्या घरगुती खाणावळींवरही नियमांची अंमलबजावणी करताना त्यांच्या व्यावसायिक परिस्थितीचा विचार करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. परवाना नसलेल्या व्यावसायिकांना थेट कारवाई करण्यापेक्षा प्रथम नियमांची माहिती देणे, परवाना काढण्याची प्रक्रिया समजावून सांगणे आणि आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. नियमांचे पालन करणाऱ्यांना प्रोत्साहन आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई, अशी दुहेरी भूमिका घेतल्यास अन्नसुरक्षेचे उद्दिष्ट साध्य होण्याबरोबरच स्थानिक रोजगारही टिकवता येईल. रायगडमध्ये येणाऱ्या पर्यटकांसाठी स्थानिक खाद्यसंस्कृती हा पर्यटन अनुभवाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे घरगुती खाणावळी मोठ्या प्रमाणावर बंद झाल्यास पर्यटकांना मिळणाऱ्या अस्सल कोकणी पदार्थांच्या पर्यायांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. परिणामी स्थानिक रोजगारासोबतच पर्यटन व्यवसायालाही अप्रत्यक्ष फटका बसू शकतो. त्यामुळे एफडीएची कारवाई थांबविण्याची नव्हे, तर कारवाईसोबत मार्गदर्शन आणि परवाना प्रक्रियेबाबत सुलभता निर्माण करण्याची गरज असल्याचे स्थानिक व्यावसायिकांकडून सांगितले जात आहे.

# आमदारांना परदेश दौऱ्याचे वेध

## विधिमंडळ सचिवालयाने मागवले पर्यटन कंपन्यांचे अर्ज

मुंबई : (स. गांवकरी)



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'काटकसरी'च्या आवाहनाला आमदारांनी केराची टोपली दाखवली आहे. काही महिन्यांपूर्वीच मिळालेल्या या सल्ल्यानंतर थंडावलेले आमदारांचे परदेश दौरे पुन्हा सुरू होण्याची चिन्हे आहेत. विधिमंडळ सचिवालयाने यासाठी पर्यटन कंपन्यांकडून निविदा मागविल्या असून, मुंबईतील आघाडीच्या कंपन्यांची यादी तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधिमंडळचे पिठासीन अधिकारी व विधिमंडळ सदस्यांच्या (आमदारांच्या) देशांतर्गत व परदेशातील अभ्यास दौऱ्यांसाठी पर्यटन कंपन्यांकडून निविदा मागविल्या आहेत. संसदीय मंडळाकडून आमदारांसाठी देशांतर्गत व परदेश अभ्यास दौरे, परिषदा आयोजित केल्या जातात. या दौऱ्यांमध्ये दोन्ही सभागृहातील सदस्यांचा समावेश असतो. यासाठी पर्यटन कंपनीला काही अटी घालण्यात आल्या आहेत. वर्षाची किमान १५ कोटींची आर्थिक उलाढाल असलेल्या कंपनीलाच हे काम दिले जाणार आहे. ही कंपनी केंद्र/राज्य सरकारकडे अधिकृतरित्या नोंदणीकृत असावी. आंतराष्ट्रीय अभ्यास दौरे आयोजित करण्याचा सात वर्षांपेक्षा अधिक अनुभव असावा, शासकीय, संसदीय, मंत्रालयीन, स्वायत्त संस्थांचे परदेश दौरे आयोजित करण्याचा पाच वर्षांचा अनुभव असावा. कंपनीची धारण क्षमता(होल्डिंग कपॅसिटी) तीन कोटी रुपयांपेक्षा अधिक असावी. यासह इतरही अनेक अटी शर्ती आहेत. दर्जाहीन व असमाधानकारक सेवा पुरवल्याचे किंवा नियमभंग झाल्याचे आढळल्यास कंपनीचे नाव यादीतून वगळण्याचा अधिकार सचिवालयाने राखून ठेवले आहेत. सर्व निर्बंध लागू असतानाच परिवहन(बंदरे) विभागाच्या अखत्यारितील महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे तीन अधिकारी ३१ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या काळात जर्मनीतील हॅम्बर्ग येथील दौऱ्यावर रवाना होणार आहेत. एसएमएम हॅम्बर्ग २०२६ या आंतरराष्ट्रीय सागर व्यापार प्रदर्शनात तीन अधिकारी सहभागी होत असून परिवहन विभागाने या तीन अधिकाऱ्यांच्या जर्मनीच्या दौऱ्याला मंजुरी दिली आहे.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# थोडक्यात पण महत्वाचे



## 'गाव तिथे उद्योजक' अभियानाला सर्वतोपरी सहकार्य : दीपक केसरकर

■ महाराष्ट्र चेंबरच्या पदाधिकाऱ्यांची आमदार दीपक केसरकर यांची सदिच्छा भेट; स्थानिक उद्योग, रोजगारनिर्मितीला चालना देण्यावर चर्चा

कुडाळ, सिंधुदुर्ग (स. गांवकरी) : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर (MACCIA)च्या पदाधिकारी आणि कोकण विभागातील गव्हर्निंग कौन्सिल सदस्यांनी आमदार दीपक केसरकर यांची कुडाळ येथे सदिच्छा भेट घेतली. या भेटीत सिंधुदुर्ग जिल्ह्यात उद्योग-व्यवसायाला चालना देणे, स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. महाराष्ट्र चेंबरचे कमिटी मेंबर तथा ठाणे जिल्हा होलसेल व्यापारी वेल्फेअर महासंघाचे अध्यक्ष सुरेश भाई ठक्कर यांनी या भेटीची माहिती दिली. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष रविंद्र माणगावे, वरिष्ठ उपाध्यक्ष करणारकर शेट्टी, ट्रस्ट बोर्डचे चेअरमन आशिष पेडणेकर, कोकण विभागाचे उपाध्यक्ष संतोष राणे तसेच कोकण विभागातील गव्हर्निंग कौन्सिल सदस्य व सभासद उपस्थित होते. या वेळी महाराष्ट्र चेंबरच्या 'गाव तिथे उद्योजक' या महत्त्वाकांक्षी अभियानाची माहिती आमदार दीपक केसरकर यांना देण्यात आली. ग्रामीण भागातील युवक आणि नागरिकांना स्थानिक पातळीवर उद्योग-व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करणे, उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करणे आणि गावागावांत उद्योजकतेचे वातावरण निर्माण करणे हा या अभियानाचा उद्देश असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## गुन्हे तपासात पोलिसांवर राजकीय दबावतंत्र की पोलीस मॅनेजमेंट?

तामसा (स. गांवकरी) : भोकर–हिमायतनगर मार्गावरील पारवा पाटीजवळ एका कंत्राटी कंपनीच्या वाहनाचा व मोटारसायकल च्या झालेल्या भीषण अपघातात दोन मजुरांचा जागीच मृत्यू, तर एक मजूर गंभीर जखमी झाल्याची घटना घडली होती. या दुर्घटनेप्रकरणी तपास सुरू असतानाच चालक बदलण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात असून, त्यामुळे संपूर्ण प्रकरणाच्या तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या दुर्घटनेप्रकरणी दि. २१ जुलै २०२६ रोजी तामसा zपोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी बदलण्यात आल्याची चर्चा परिसरात सुरू असून, या चर्चेमुळे पोलिसांच्या तपासाच्या निष्पक्षतेबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अपघाताच्या वेळी घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही प्रत्यक्षदर्शींनी चालक बदलण्याच्या प्रकाराबाबत संशय व्यक्त केला असून, पोलिसांवर राजकीय दबावतंत्राचा वापर करण्यात आला असावा, अशी भावना व्यक्त केल्याचे समोर येत आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता पुरावे, प्रत्यक्षदर्शींचे जबाब आणि उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे कारवाई करणे अपेक्षित असते. मात्र, एखाद्या प्रकरणात राजकीय किंवा प्रभावशाली व्यक्तींचा हस्तक्षेप झाल्याची भावना निर्माण झाली, तर त्याचा सर्वाधिक फटका सामान्य आणि गरीब नागरिकांना बसतो, अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

## गुटख्याचे ग्रामीण भागात 'पाय पसरले'; लपूनछपून विक्री सुरू?

तामसा (स. गांवकरी) : गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर कायदेशीर निर्बंध असतानाही ग्रामीण भागात त्याचा वाढता फैलाव होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील काही ठिकाणी लपूनछपून विक्री सुरू असल्याची चर्चा असून, आता ग्रामीण भागातील किराणा दुकाने, पानटपऱ्या आणि इतर ठिकाणीही गुटख्याची उपलब्धता वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे कारवाईची भीती असतानाही काही विक्रेते गुटखा थेट दुकानात न ठेवता मागील बाजूस किंवा ठरावीक ग्राहकांना संपर्कातून पुरवत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे बंदी असतानाही गुटखा सहज उपलब्ध होत असल्याने संबंधित यंत्रणेच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन वाढत असल्याने पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. गुटखा विक्रीला आळा घालण्यासाठी नियमित तपासणी, अचानक छापे आणि विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. 'बंदी कागदावरच की प्रत्यक्षात?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, संबंधित विभाग गुटखा विक्रीविरोधात आता ठोस कारवाई करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## नेपाळमध्ये अडकलेल्या कुटुंबीयांनी कार्यकेंद्राशी संपर्क साधावा

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर विविध देशांतील पर्यटक व नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातील जे पर्यटक सध्या नेपाळमध्ये असून पूरस्थितीमुळे अडकले आहेत किंवा ज्यांचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क होत नाही, त्यांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी तात्काळ जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. यासाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधता येईल : जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, नांदेड 02462-235077 1077 (टोल फ्री) नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांची माहिती प्रशासनाला देताना संबंधित व्यक्तीचे नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण/हॉटेल, प्रवासाचा तपशील आणि कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक उपलब्ध असल्यास तो द्यावा. नांदेड जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून न जाता अधिकृत माहितीसाठी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. आपत्तीग्रस्त भागातील नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती माहिती व समन्वय साधण्याचे प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहेत.

## धरणातील पाणीसाठा समाधानकारक

शिवनेरी (स. गांवकरी) : येडगाव माणिकडोह वडज पिंपळगाव जोगे डिंभे विसापुर चिल्हेवाडी व घोड या धरणातील पाणीसाठा समाधानकारक आहे . या कुकडी प्रकल्पातील धरणातील मागील वर्षाचा उपयुक्त साठा दशलक्ष घनफूट २४०८३ . २५ व मागील वर्षीची ८१ % १५ टक्के साठा होता .कुकडी प्रकल्प धरणातील आजचा उपयुक्त साठा दशलक्ष घनफूट २७३९२ . ४० व धरणातील आजची ९२ % ३० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे .कुकडी प्रकल्पपाणीसाठा धरणातील आजचा एकूण आवक दशलक्ष घनफूट ५२६३५ .५५ आहे. धरणातील आजचा सांडवा नदी द्वारे क्युमेक्स पुढील प्रमाणे वडज ४०० , डिंभे डावा २७०० व उजवा ५५० , चिल्हेवाडी ६०० आहे . धरणातील कालव्याद्वारे शेतीसाठी पाणी क्युमेक्स पुढील प्रमाणे येडगाव १४०० , वडज १०० , पिंपळगाव जोगे २२५ , डिंभे उजवा १०० ,विसापुर ८०, घोड डावा १०० व उजवा ७५ प्रमाणे सोडण्यात आले आहे.

# पत्रकारांच्या हक्कांसाठी लढणारे नेतृत्व



### ज्येष्ठ पत्रकार मा. संजयजी भोकरे यांचा डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते वाढदिवसानिमित्त सत्कार!

पुणे : (स. गांवकरी)

पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने आवाज उठविणारे, पत्रकार संघटनेच्या माध्यमातून राज्यभरातील पत्रकारांना संघटित करणारे ज्येष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक मा. संजयजी भोकरे साहेब यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी भोकरे यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचा खारीक-खोबऱ्याचा हार, पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला आणि त्यांना उदंड आयुष्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. संजयजी भोकरे यांनी पत्रकारांच्या विविध





प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला असून ग्रामीण व शहरी भागातील पत्रकारांच्या अडचणी सोडविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. पत्रकारांना विमा संरक्षण, पत्रकार भवन, शैक्षणिक सवलती, अधिस्वीकृतीसाठी पाठपुरावा तसेच पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर आंदोलने व मोर्चांच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचे काम त्यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे. पत्रकारांच्या सामाजिक बांधिलकीलाही त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले आहे.

पत्रकार संघटनेच्या विस्तारासाठी आणि पत्रकारांच्या हक्कांसाठी भोकरे यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांची प्रदीर्घ वाटचाल, संघटनात्मक नेतृत्व आणि पत्रकारांच्या प्रश्नांसाठीची तळमळ यांचा गौरव करत डॉ. आरोटे यांनी त्यांना निरोगी, आनंदी व दीर्घायुष्य लाभावे आणि भविष्यातही त्यांच्या हातून पत्रकार व समाजहिताचे कार्य घडत राहावे, अशा शुभेच्छा दिल्या.

## सिंधुदुर्गमध्ये 'गाव तिथे उद्योजक' अभियानाचा शुभारंभ

मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड एग्रीकल्चरचे कमिटी मेंबर आणि ठाणे जिल्हा होलसेल व्यापारी वेल्फेअर महासंघाचे अध्यक्ष श्री सुरेश भाई ठक्कर यांनी सांगितले की महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरच्या 'गाव तिथे उद्योजक' या महत्त्वाकांक्षी अभियानाचा शुभारंभ सिंधुदुर्ग जिल्ह्यात मा. ना. नितेश राणे, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री आणि आमदार निलेश राणे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला.

'गाव तिथे उद्योजक' ही महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष मा. रविंद्र माणगावे यांची संकल्पना असून, ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना देत प्रत्येक गावात उद्योजक घडविण्याचे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. कोकण पातळीवर उपाध्यक्ष डॉ. संतोष राणे यांच्या विशेष प्रयत्नांतून या अभियानाचा सिंधुदुर्गमध्ये शुभारंभ होत आहे.



ग्रामीण भागातील युवकांना उद्योगाच्या संधी उपलब्ध करून देत गावागावात उद्योजक निर्माण करण्याच्या या अभियानाला आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन मा. ना. नितेश राणे यांनी दिले. अशा प्रकारचे अभियान ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी अत्यंत गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र चेंबरचे ट्रस्ट बोर्डचे अध्यक्ष आशिष पेडणेकर आणि वरिष्ठ उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी उपाध्यक्षा डॉ. धनश्री हरदास, सुनिता फाल्गुने , सर्व पदाधिकारी यांच्यासह महाराष्ट्र चेंबरचे गव्हर्निंग कौन्सिल मेंबर्स व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नालेसफाई भ्रष्टाचार प्रकरणानंतर सिटी इंजिनिअर सारिका आकुलवार यांची उचल बांगडी

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर महानगरपालिकेच्या अभियांत्रिकी विभागात मोठा प्रशासकीय फेरबदल झाला असून, नीलकंठ मठपती यांच्याकडे नगर अभियंता पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या स्वाक्षरीने २० ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या कार्यालयीन आदेशात याची नोंद आहे.

दरम्यान, नगर अभियंता पदाचा कार्यभार सांभाळत असताना सारिका आकुलवार यांच्यावर नालेसफाईच्या कामात गैरप्रकार व आर्थिक अनियमिततेचे गंभीर आरोप झाले होते. या प्रकरणाची पोलखोल नगरसेवक अनंत जाधव यांनी कागदपत्रे आणि पुराव्यांच्या आधारे केली असल्याचा दावा करण्यात आला होता. जाधव यांनी संबंधित प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी सातत्याने लावून धरली होती.

नालेसफाईच्या कामातील

### नीलकंठ मठपतींकडे नगर अभियंता पदाची जबाबदारी



कथित गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती. चौकशी समितीच्या अहवालात सारिका आकुलवार यांच्यावर ठपका ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात आला असून, त्यानंतर अखेर त्यांच्या नगर अभियंता पदाच्या जबाबदारीतून बदल करण्यात आल्याचे समोर आले आहे.

महापालिकेच्या अधिकृत आदेशानुसार, नीलकंठ मठपती यांच्याकडे नगर अभियंता पदाचे काम सोपविण्यात आले आहे. तर सारिका आकुलवार यांची बदली सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाकडे करण्यात आली असून, त्यांच्याकडे परिवहन विभागाचे नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. नालेसफाई प्रकरणात अनियमिततेचे आरोप झाल्यानंतर नगरसेवक अनंत जाधव यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत चौकशी आणि कारवाईची मागणी केली होती. या पाठपुराव्यामुळेच प्रकरण चौकशीच्या टप्प्यावर गेले आणि आता प्रशासकीय फेरबदलाच्या माध्यमातून सारिका आकुलवार यांच्याकडील नगर अभियंता पदाची जबाबदारी काढून घेण्यात आली, असा दावा केला जात आहे.

महापालिकेच्या अधिकृत आदेशात मात्र बदल्या व कामकाजाच्या जबाबदाऱ्यांचा उल्लेख आहे; नालेसफाई प्रकरणातील आरोप किंवा चौकशी समितीच्या निष्कर्षांचा या आदेशात स्वतंत्र तपशील दिलेला नाही.

नगर अभियंता पदाची जबाबदारी आता नीलकंठ मठपती यांच्याकडे आल्याने महापालिकेतील अभियांत्रिकी विभागाच्या कामकाजाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शहरातील विकासकामे, नालेसफाई, रस्ते, बांधकामे आणि प्रलंबित अभियांत्रिकी कामांमध्ये पारदर्शकता व गुणवत्ता राखण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे.

नालेसफाई प्रकरणातील आरोप, चौकशी अहवाल आणि त्यानंतर झालेला प्रशासकीय बदल यामुळे सोलापूर महापालिकेच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आता पुढील काळात प्रशासन या प्रकरणात आणखी काय कारवाई करते, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

## नव्हरस ग्रुपच्या आदिवासी कलाकारांनी जिंकली रसिकांची मने

डांग, गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील सापुतारा येथे सुरू असलेल्या मोन्सून फेस्टिव्हल–२०२६ मध्ये नव्हरस ग्रुपच्या आदिवासी कलाकारांनी लोकसंस्कृती आणि पारंपरिक कलेचे अप्रतिम सादरीकरण करून उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

दि. २३ रोजी तेजस्विनी संस्कृती धाम, वासूर्णा येथे ब्रह्मवादिनी पू. डॉ. हेतलदीदी यांच्या सान्निध्यात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. जय वशी यांच्या मार्गदर्शनाखाली नव्हरस ग्रुपच्या आदिवासी कलाकारांनी लोकगीते, पौराणिक गीते तसेच गरब्याचे मनमोहक सादरीकरण केले. कलाकारांच्या कलाविष्काराला उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. पू. डॉ. हेतलदीदी यांच्या मार्गदर्शनाखाली नव्हरस ग्रुपमधील आदिवासी मुले आणि युवकांना विविध ठिकाणी आपली कला सादर करण्याची संधी मिळत आहे. दुर्गम




गावांतील आदिवासी युवकांच्या अंगी असलेली कला व कौशल्याला योग्य व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबत चारित्र्य निर्माण व्हावे, यासाठी तेजस्विनी संस्कृती धामच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रयत्न केले जात आहेत. यानंतर दि. २४ रोजी सापुतारा येथे आयोजित मोन्सून फेस्टिव्हल–२०२६ मध्ये नव्हरस ग्रुपच्या कलाकारांनी पुन्हा एकदा शानदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. लोकसंस्कृती, पौराणिक कथा आणि पारंपरिक नृत्याच्या सुंदर सादरीकरणाने सापुताऱ्याचेवातावरणही आदिवासी संस्कृतीच्या रंगात रंगून गेले.नव्हरस ग्रुपच्या सादरीकरणाला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच पर्यटन विभागालाही हा कार्यक्रम पसंत पडल्याने आज पुन्हा या आदिवासी कलाकारांना सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी विशेष निमंत्रण देण्यात आले आहे.

पू. डॉ. हेतलदीदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉ. जय वशी यांच्या मार्गदर्शनातून नव्हरस ग्रुपमधील आदिवासी मुलांना मिळालेली ही संधी त्यांच्या कला व प्रतिभेला मोठे प्रोत्साहन देणारी ठरत आहे. या संपूर्ण कार्यक्रमांच्या माध्यमातून डांग जिल्ह्यातील आदिवासी कला, संस्कृती आणि परंपरेला मोठे व्यासपीठ मिळाले असून, आदिवासी युवकांच्या आत्मविश्वासाला आणि सर्जनशीलतेलाही नवी झेप मिळाली आहे. भविष्यातही अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन होऊन डांगची समृद्ध आदिवासी लोककला देश-विदेशापर्यंत पोहोचावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## गावांना विकासासाठी निधी कमी पडणार नाही : आ. बाबुराव कदम

अर्धापूर : (स. गांवकरी)

तालुक्यातील निमगाव परिसरात विकासकामांना गती देऊन विविध विकास कामासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू असून लवकरच विकास कामे मार्गी लावणार असल्याचे आश्वासन उपस्थित गावकऱ्यांना आमदार बाबुराव कदम यांनी दिले आहे. अर्धापूर तालुक्यातील निमगाव येथे दि. २५ मंगळवारी रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख उपस्थितीत आ.बाबुराव कदम, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख,माजी संचालक दत्ता पाटील,भाजपाचे आनंदराव भंडारे,कृऊबाचे सभापती गंगाधर चाभरेकर, तालुकाप्रमुख संतोष कपाटे, सरपंच संजय मोळके,उपसरपंच वसंतराव चव्हाण, माजी सभापती दिलीपराव देवगुंडे,माजी सभापती श्रीमती पद्मावतीबाई घोरपडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास तसेच स्व.चंद्रकांत घोरपडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण आमदार कोळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा पुरस्कारांतर्गत निकषांमध्ये बदल झाल्यामुळे निमगाव आणि निवघा येथील जिल्हा परिषद शाळांना हा बहुमान मिळाला. या पार्श्वभूमीवर आमदार कदम यांनी निमगाव येथील जिल्हा परिषद शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तर राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे मराठी भाषा विभाग असून त्यांच्या माध्यमातून निमगाव गावाला पुस्तकाचे गाव बनवण्यासाठी नक्की प्रयत्न करू अशी ग्वाही आ. कदम यांनी दिली.

# मुंबई आंदोलनापूर्वी तुपकरांना पोलिसांची नोटीस

### 'अशा नोटीसींना आम्ही घाबरत नाही ! २७ ऑगस्टला मुंबईत आंदोलन होणारच'; मंत्र्यांचे बंगले-गाड्या जाहीर लिलावाच्या इशाऱ्याने सरकारची धावपळ..!

बुलढाणा : (स. गांवकरी)

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी २७ ऑगस्ट रोजी मुंबईत प्रस्तावित केलेल्या आक्रमक आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना बुलढाणा शहर पोलिसांनी कडक नोटीस बजावली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६८ अन्वये ही नोटीस देण्यात आली असून, आंदोलनादरम्यान कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्याचे निर्देश पोलिसांनी दिले आहेत. विशेष म्हणजे, बुलढाणा शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संग्राम पाटील यांनी स्वतः तुपकरांना ही नोटीस बजावली आहे. तुपकरांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सरकारने



सकारात्मक निर्णय न घेतल्यास २७ ऑगस्टला मुंबईतील मंत्रालय परिसरात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. मंत्र्यांचे बंगले आणि शासकीय वाहने प्रतीकात्मकरीत्या जप्त करून त्यांचा जाहीर लिलाव करण्याची घोषणाही त्यांनी केली होती. या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने आंदोलनापूर्वीच तुपकरांना प्रतिबंधात्मक नोटीस बजावल्याने आता आंदोलन आणखी तापण्याची चिन्हे आहेत. २३ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या नोटीसमध्ये पोलिसांनी तुपकरांना आंदोलनादरम्यान दखलपात्र गुन्हा घडेल किंवा सार्वजनिक शांततेला बाधा निर्माण होईल, असे कोणतेही कृत्य करू नये, असे बजावले आहे. तसेच शासकीय बंगले, कार्यालये किंवा शासकीय वाहनांबाबत अनधिकृत ताबा, अडथळा, नुकसान अथवा प्रत्यक्ष कृती होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, काही अनुचित प्रकार झाल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

पोलिसांची नोटीस मिळाल्यानंतर रविकांत तुपकरांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. "अशा नोटीसा आम्हाला नवीन नाहीत. अशा नोटीसींना आम्ही भीक घालत नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून आम्हाला आंदोलनाचा आणि न्यायासाठी संघर्ष करण्याचा अधिकार दिला आहे. हा अधिकार कुणीही हिसकावून घेऊ शकत नाही," असा थेट पलटवार तुपकरांनी केला."आम्ही काही चोर-दरोडेखोर नाही, आम्ही काही मर्डर केलेले नाही. शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आम्ही आंदोलन करीत आहोत. त्यामुळे केवळ नोटीस बजावून आम्हाला आंदोलनापासून परावृत्त करता येणार नाही," असा संतप्त इशाराही त्यांनी दिला.

सरकार आणि प्रशासनाने कितीही दबाव आणला तरी आंदोलन मागे घेणार नसल्याचे तुपकरांनी स्पष्ट केले आहे. "काहीही झाले तरी २७ ऑगस्टला मुंबईत आंदोलन होईलच. सरकारने आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला, तर त्याचे गंभीर परिणाम सरकारला भोगावे लागतील," असा इशारा त्यांनी दिला. त्यामुळे आता पोलिसांची प्रतिबंधात्मक नोटीस आणि तुपकरांची आक्रमक भूमिका यामुळे २७ ऑगस्टच्या मुंबई आंदोलनाकडे संपूर्ण राज्यभरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांऐवजी २ लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे, आयटीआर भरणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या कक्षेत आणावे, २००९,२०१७ व २०१९ च्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांना लाभ द्यावा, कर्ज पुनर्गठनामुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्यांना योजनेत समाविष्ट करावे, मयत पात्र शेतकऱ्यांच्या वारसांना लाभ द्यावा तसेच ओटीएसमुळे शेतकऱ्यांचा सिबिल स्कोअर खराब होणार नाही, याची हमी द्यावी,यासह अजून काही मागण्या तुपकरांनी सरकारसमोर ठेवल्या आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### स्वारातीम विद्यापीठ उपकुलसचिव पदी पेदेवाड यांच्या नियुक्ती बदल सत्कार

नवीन नांदेड (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील कर्मचारी रामदास पेदेवाड यांची पदोन्नतीने उपकूलसचिव पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र सिडको नविन नांदेड यांच्या वतीने करण्यात आला. पेदेवाड यांची पदोन्नती झाल्याबद्दल सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय सिडको येथील कर्मचारी लेखापाल गूंडे बळीराम , लिपीक पाळेकर राजेश्वर, ग्रंथपाल सुनिल राठोड सहा.ग्रथंपाल मोरे संतोष, गणेश तेलंगे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्यातर प्राचार्य एन.जी.पाटील यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या आहेत.

### व्याख्याते प्रा. प्रदीप कदम हे दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित!



नवीन नांदेड (स. गांवकरी) : महाराष्ट्रातील नामवंत व्याख्याते प्रा. प्रदीप कदम यांचा स्वराज्य फिल्म प्रोडक्शनच्या वतीने दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. कलावंत दादासाहेब फाळके पुरस्कार वितरण सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. प्रा. प्रदीप कदम हे महाराष्ट्रासह महाराष्ट्राबाहेरही ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक आणि प्रेरणादायी विषयांवर प्रभावीपणे प्रबोधन करीत आहेत. त्यांच्या व्याख्यानांचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाले आहेत. प्रेरणादायी वक्ते म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली असून त्यांनी अनेक गीते लिहिली आहेत. तसेच विविध कथानकांतील संवादलेखनही केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी अभिनय क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. प्रा. कदम यांच्या विविध क्षेत्रांतील योगदानाची दखल घेत स्वराज्य फिल्म प्रोडक्शनने त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले. त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत. या सोहळ्यास प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक बाळासाहेबजी बांगर, प्रसिद्ध सिनेअभिनेत्री मृणाल कुलकर्णी, दिग्दर्शक रमेश चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. गिरीश राजूरकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुरस्कार सोहळ्याचे संयोजन केले, तर रवीना निकम यांनी सूत्रसंचालन केले.

### संविधानविरोधी लोकांवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करा : रामदास आठवले



सोलापूर (स. गांवकरी) : नवी दिल्लीच्या जंतर-मंतरवर कॉक्रोच जनता पार्टीचं नीट पेपरफुटीविरोधात आंदोलन यशस्वी झालं. त्यानंतर काही दिवसांनी सोशल मीडियावर आरक्षणाच्या विरोधातही आंदोलन तापलं होतं. एका संघटनेने आरक्षणाच्या विरोधात दिल्लीच्या जंतरमंतरवर आंदोलनाची घोषणा केली होती. त्यानंतर अवघ्या दोन दिवसांपूर्वी काही आंदोलक जंतरमंतरवर आंदोलनासाठी उतरले. परंतु पोलिसांनी आंदोलन मोडीत काढल्याची माहिती मिळतेय. या आंदोलनामुळे देशात पुन्हा एकदा आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आक्रमक भूमिका स्पष्ट केली आहे. आरक्षण विरोधात जे लोक भूमिका घेतात;आरक्षण संपवण्याची मागणी करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कारवाई केली पाहिजे.आरक्षणाला विरोध म्हणजे संविधानाला विरोध. आरक्षण विरोधी भूमिका घेणारे लोक संविधान विरोधी असून त्यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई केली पाहिजे अशी आक्रमक मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केली आहे. काही लोक आरक्षण हटवण्याची मागणी करत आहे. आरक्षण हटवण्यासाठी सोशल मीडियावर अभियान चालवलं जात आहे. आंदोलकांकडून जंमरमंतरवर आंदोलन करून आरक्षण हटवण्याची मागणी केली जात आहे. सोशल मीडियावर आरक्षण हटवणे किंवा त्यात सुधारणा आणण्याची मागणी केली जात आहे. परंतु आरक्षण हटवले जाऊ शकत नाही. आरक्षण आमचा संविधानिक अधिकार आहे असे ना. रामदास आठवले म्हणाले.

### डॉ. यशवंत पवार यांना राष्ट्रीय स्तरावरील 'आयकॉनिक इंडिया अवॉर्ड' प्रदान




कन्नड (स. गांवकरी) : वैद्यकीय सेवा आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. यशवंत पवार यांना स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित 'आयकॉनिक इंडिया अवॉर्ड' (Iconic India Award) प्रदान झाला आहे. हा पुरस्कार भारत सरकारचे नीती आयोग, कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालय आणि MSME मंत्रालय मान्यताप्राप्त 'त्रेतायुग फाउंडेशन' तर्फे प्रदान करण्यात आला आहे. डॉ. यशवंत पवार हे वैद्यकीय क्षेत्रात गेल्या ४० वर्षांपासून सातत्याने कार्यरत आहेत. केवळ वैद्यकीय उपचार न करता आजाराचे मूळ शोधणे, आजार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आणि लोकांना निरोगी जीवनशैलीकडे वळवणे हा त्यांच्या कार्याचा मुख्य उद्देश राहिला आहे. विषमुक्त अन्न, शुद्ध व भेसळमुक्त आहार, पौष्टिक पोषण (Nutrition) या विषयांवर त्यांनी जनजागृतीचा वस्तुपाठ घालून दिला आहे. वैद्यकीय सेवेसोबतच त्यांनी खालील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला आहे: शिक्षण, आरोग्य आणि साक्षरता अभियान व्यसनमुक्ती आणि एड्स जनजागृती पर्यावरण सुरक्षा आणि लोकसंख्या नियंत्रण सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम डॉ. पवार यांना यापूर्वीही केंद्र शासनाचा 'नेहरू युवा पुरस्कार', 'अंधश्रद्धा निर्मूलन पुरस्कार', 'स्वामी विवेकानंद पुरस्कार', राज्यस्तरीय 'समता पुरस्कार' आणि राज्यस्तरीय 'दर्पणरत्न पत्रकारिता पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे. आता त्यांच्या खात्यात पहिल्यांदाच राष्ट्रीय स्तरावरील 'आयकॉनिक इंडिया अवॉर्ड'ची भर पडली आहे. या विशेष राष्ट्रीय सन्मानाबद्दल त्यांचे जयकाली सांस्कृतिक मंडळ, मराठा उत्कर्ष मंडळ, तसेच डॉ. सतीश वैष्णव, डॉ. प्रकाश नागणे, डॉ. केशव शिरसे, डॉ. पी. ए. झगरे, मेक अँड ग्रोथ इंडिया कन्सलटन्सीचे एमडी मुकुंद वाकळे, सौ. अनिता पवार, राजेंद्र जगधणे, अशोक पवार, विलासराव हासे आणि श्याम दंडवते ,सुनिल पवार (शहर प्रमुख भाजप)पंडीतसर पत्रकार नेवासा ,शिंदे सर , रोहिणी शिकारे ,सारीका काळे झगरे सर यांच्यासह अनेक मान्यवरांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे.

# बाजार समित्यांतील प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढणार

## पणनमंत्री रावल यांचे व्यापाऱ्यांना आश्वासन : शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांच्या हिताचा समतोल साधण्याचे आश्वासन

मुंबई : (स. गांवकरी)

शेतकरी, व्यापारी आणि ग्राहक यांच्या हिताचा समतोल साधत कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील विविध प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिले. महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या विविध मागण्यांबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.



शेतकरी, व्यापारी आणि बाजार समित्यांना पाठबळ देणे ही शासनाची भूमिका आहे. कोणत्याही घटकाचे नुकसान होणार नाही तसेच ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, याची दक्षता घेऊन निर्णय घेतले जातील, असे रावल यांनी स्पष्ट केले. बाजार समित्यांमधील प्रश्न सोडविण्यासाठी बाजार समित्यांचे पदाधिकारी आणि व्यापारी प्रतिनिधी यांची बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

काही शेतमाल उत्पादनांवर दुहेरी कर आकारला जात असल्यास व्यापारी संघटनांनी त्याबाबत सविस्तर निवेदन सादर करावे. त्याची तपासणी करून करभार कमी करण्यासाठी जीएसटी आयुक्तांसोबत चर्चा केली जाईल, असे रावल यांनी नमूद केले.

बैठकीत व्यापारी प्रतिनिधींनी कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील यूजर चार्जेस आणि सर्व्हिस चार्जेस रद्द करावेत, सेसऐवजी मेंटेनन्स चार्जेस आकारावेत, बाजार समित्यांचे कायदे व नियम काळानुरूप बदलावे आणि 'इज ऑफ डुईंग बिझनेस'ला पूरक पारदर्शक व्यवस्था निर्माण करावी, अशा विविध मागण्या मांडल्या. नोंदणीकृत आणि अनोंदणीकृत

### मार्केट सेस, यूजर व सर्व्हिस चार्जेससह विविध मागण्यांवर चर्चा

व्यापाऱ्यांमधील कर आकारणीतील तफावत दूर करण्याची मागणीही करण्यात आली.

चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्री अँड ट्रेडचे अध्यक्ष दिपेन आगरवाल यांनी व्यापारी कृती समितीच्या निवेदनाची दखल घेत बैठक आयोजित केल्याबद्दल शासनाचे स्वागत केले. व्यापाऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर तातडीने मार्ग काढण्याची मागणी त्यांनी केली.

चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्री अँड ट्रेडचे चेअरमन मोहन गुरनानी यांनी यूजर चार्जेस आणि सर्व्हिस चार्जेसच्या नोटिसांवर आक्षेप घेतला. कोणताही कायदेशीर आधार किंवा परवानगी नसताना मागील तारखेच्या नोटिसा काढण्यात आल्याचा आरोप करत त्या तातडीने मागे घेण्याची मागणी त्यांनी केली. त्यावर योग्य तोडगा काढण्याचे आश्वासन पणनमंत्र्यांनी दिले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी ४ ऑगस्ट रोजी कोल्हापूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या परिषदेची माहिती दिली. मार्केट सेसमुळे राज्यातील व्यापारी त्रस्त असून, सेसच्या तुलनेत बाजार समित्यांकडून आवश्यक सुविधा पुरवल्या जात नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. मार्केट सेसबाबत निर्णय न झाल्यास २ ऑक्टोबरपासून असहकार आंदोलन करून मार्केट सेस न वसूल करण्याचा तसेच बाजार समितीत तो न भरण्याचा इशारा त्यांनी दिला.

महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष आणि कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे यांनी व्यापारी बाजार समित्यांमध्ये नगरपालिका व महानगरपालिकांना घरफाळा आणि पाणीपट्टी भरत असतानाही बाजार समित्यांकडून पुरेशा सुविधा मिळत नसल्याचे सांगितले. काही बाजार समित्यांमध्ये सर्व्हिस चार्जेस आकारले जात असल्याने दुहेरी कर आकारणी होत असून ती शासनाच्या 'इज ऑफ डुईंग बिझनेस' धोरणाला मारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## युवकांनी इतिहास घडवावा, नोकऱ्या देणारे व्हावे : कदम

तळेगाव दाभाडे : (स. गांवकरी)

"नोकऱ्या मिळविण्यापेक्षा नोकऱ्या देणारे व्हा. स्पर्धेच्या लढाईत सातत्य ठेवले, तर यश मिळवता येते. इतिहास बदलण्यासाठी मेहनत, कष्ट आणि अभ्यासाची गरज आहे. युवकांनी जग बदलण्याची व समाज घडविण्याची वृत्ती जोपासावी. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी 'एआय' तंत्रज्ञान विकसित करून समाजव्यवस्थेतील बदलाचे माध्यम व्हावे," असे प्रतिपादन व्याख्याते प्रदीप कदम यांनी केले. माजी आमदार कृष्णराव भेगडे यांच्या जयंतीनिमित्त नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित 'अक्षय स्मृती अभिवादन सभेत' कदम बोलत होते. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष नंदकुमार शेलार, सचिव संतोष खांडगे, चेअरमन राजेश म्हस्के, गणेश खांडगे, यादवेंद्र खळदे, चंद्रकांत शेटे, महेश शहा, सोनबा गोपाळे, दामोदर शिंदे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश



देसाई, डॉ. रामचंद्र जहागीरदार आदी उपस्थित होते. डॉ. देसाई म्हणाले, "पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टला कृष्णराव भेगडे यांनी मदत केली. त्यांच्या सहकार्यामुळे या दोन्ही संस्था उभ्या राहिल्या. समाजासाठी आपण कसे उपयोगी ठरू शकतो, हे कृतीतून दाखविणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल." या वेळी मोक्षदा माळी यांनी रेखाटलेल्या कृष्णराव भेगडे यांच्या तैलचित्राचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. 'एनएमआयटी'चे संचालक डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले.

## जिद्द, सातत्य आणि सकारात्मक विचारांनी यशाचा मार्ग नक्की सापडतो

अक्कलकोट : (स. गांवकरी)

जिद्द, सातत्य आणि सकारात्मक विचारांनी यशाचा मार्ग नक्की सापडतो असे प्रतिपादन अक्कलकोट पंचायत समिती चे उपसभापती सागर कल्याणशेट्टी यांनी केले

हालहळ्ळी (अ) येथे गुणवंतांचा भव्य सत्कार; UPSC,MPSC सह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला यावेळी ते बोलत. अपयश हे शेवट नसून नव्या प्रयत्नांची सुरुवात असते. प्रत्येक चूक आपल्याला काहीतरी शिकवते आणि प्रत्येक अडचण आपल्याला अधिक सक्षम बनवते. नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन आणि सकारात्मक विचाराच्या जोरावरच कोणतेही ध्येय सहज साध्य करता येत असल्याचे ही त्यांनी सांगितले. अक्कलकोट तालुक्यातील हालहळ्ळी (अ ) येथे उज्वल यश संपादन केलेल्या सत्कारमुर्तींचा सन्मान सोहळा ग्रामपंचायत व समस्थ ग्रामस्थ हालहळ्ळी (अ) यांच्या वतीने भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.




### उपसभापती सागरदादा कल्याणशेट्टी

या वेळी उपसभापती सागरदादा कल्याणशेट्टी बोलत होते. यावेळी उपसभापती सागरदादा कल्याणशेट्टी व मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या सर्वांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी विमल गव्हाणे, सुभद्राबाई अकतनाळ,चपळगावचे सरपंच वर्षा भंडारकवठे, सिध्दाराम भंडारकवठे, किणीचे उपसरपंच अमोल हिप्परगे, हालहळ्ळी(अ) चे निलप्पा बिराजदार, ग्रामसेविका सुरेखा सरवळे, श्रीशैल स्वामी,शिवनिंगप्पा वंगे, डॉ.भिमाशंकर बिराजदार सर,माजी सरपंच विश्वनाथ दोड्याळे, पोलिस पाटील मल्लिकार्जुन बिराजदार, शशिकांत स्वामी,डॉक्टर मल्लिनाथ स्वामी आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास मार्डी महात्मा फुले प्रशालेचे पर्यवेक्षक गंगाधर राजमाने, सुभाष ढब्बे, चंद्रकांत स्वामी, यशवंत इंगळे, शंभुलिंग अकतनाळ, वीरेश कोन्हाळे, गुरुनाथ गोविंदे, राजकुमार बिराजदार, गंगाधर वळदड्डे, अनिल स्वामी, श्रीशैल बिराजदार, रामण्णा बोराळे,भोजराया पाटील, सिध्दाराम बिराजदार,नागय्या स्वामी,भुजय्या स्वामी, बसवराज बन्ने गुरुजी, स्वामीनाथ परशेट्टी, बापूराव गोविंदे , गौरीशंकर दोड्याळे,रमेश परशेट्टी, महंमद नदाफ यांच्या सह हालहळ्ळी(अ), चपळगाववाडी, चपळगाव, तीर्थ ,कर्जाळ, कोन्हाळी,सोलापूर यासह आदी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समस्त हालहळ्ळी(अ) करांनी परिश्रम घेतले.

## शिऊर-वळसांगवी शेतरस्त्यावरील पूल चार वर्षांपासून रखडला

सोलापूर : (स. गांवकरी)

शिऊर ते वळसांगवी – काटेजवळगा – आनंदवाडी फाट्याला जोडणाऱ्या शेतरस्त्यावर उभारण्यात येत असलेला पूल मागील चार वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत पडून असल्याने परिसरातील शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आहे. चार वर्षांपूर्वी मोठ्या गाजावाजात सुरू झालेले हे बांधकाम आजतागायत पूर्ण न झाल्याने प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

हा पूल शिऊर, वळसांगवी, काटेजवळगा व आनंदवाडी या चार गावांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या शेतरस्त्यावर आहे.

या पुलामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्यासाठी तसेच शेतमाल वाहतुकीसाठी मोठी सोय होणार होती. मात्र चार वर्षे उलटून गेल्यानंतरही काम अधांतरीच राहिल्याने शेतकरी अक्षरशः हैराण झाले आहेत. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षी उन्हाळा



आला की काही दिवस काम सुरू केले जाते आणि पावसाळा सुरू होताच काम बंद केले जाते.असा काम सुरू-बंदचा प्रकार गेल्या चार वर्षांपासून सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे पुलाचे बांधकाम पूर्ण होण्याऐवजी वर्षानुवर्षे रखडत चालले आहे.

पावसाळ्यात पुलाजवळ मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने हा रस्ता पूर्णपणे बंद पडतो. परिणामी शेतकऱ्यांना शेतात जाणे-येणे अत्यंत कठीण होते. ऊसासह इतर शेतमाल वाहतूक, खत-बियाणे ने-आण तसेच जनावरांची ये-जा यावर मोठा परिणाम होत आहे. धनेगाव डॅम च्या पाण्यामुळे अनेक महिने हा मार्ग बंद राहत असल्याने शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतावर जाण्यासाठी सुमारे पाच किलोमीटरचा मोठा फेरा मारावा लागत असल्याची तक्रार आहे. मागील वर्षी या समस्येवर तात्पुरता उपाय म्हणून काही शेतकऱ्यांनी स्वतःच्या खिशातून जवळपास ४० हजार रुपये खर्च करून पुलाजवळ खडक टाकून रस्ता मोकळा करण्याचा प्रयत्न केला. मात्र पावसाळ्यात आलेल्या पाण्याने ते खडक वाहून गेल्याने शेतकऱ्यांचा सर्व प्रयत्न वाया गेला.

या पुलाचे काम नेमके कोणत्या विभागाच्या अखत्यारीत आहे आणि ते का रखडले आहे, याबाबतही स्पष्ट माहिती मिळत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. स्थानिक पातळीवर हे काम महाराष्ट्र वॉटर रेस्कोर्स डिपार्टमेंट च्या अखत्यारीत असल्याची चर्चा असली तरी अधिकृत स्तरावर याबाबत कोणतीही स्पष्टता करण्यात आलेली नाही. दरम्यान,या प्रकरणी संबंधित कंत्राटदाराशी शेतकऱ्यांसमक्ष भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधण्यात आला असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. विशेष म्हणजे, गेल्या वीस वर्षांपासून संभाजी पाटील - निलंगेकर हे निलंगा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. मात्र इतक्या महत्त्वाच्या शेतकऱ्याच्या प्रश्नाकडे अद्याप लक्ष दिले गेले नसल्याची नाराजीही स्थानिक शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. चार वर्षांपासून रखडलेल्या या पुलामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून पुलाचे काम पूर्ण करावे, अन्यथा संबंधित विभागाविरोधात तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

## ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सदस्यपदी ॲड. महेश कडूस पाटील

ठाणे : (स. गांवकरी)

कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील नवोदित अधिवक्ता महेश कडूस पाटील यांची ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य म्हणून थेट नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाच्या वतीने करण्यात आली. ही नियुक्ती अधिकृत मुलाखत परिक्षेद्वारे करण्यात आली आहे. सध्या महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरणाने राज्यातील २९ जिल्ह्यातील नियुक्तया मुंबई उच्च न्यायालयाच्या परवानगी ने नुकत्याच केल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्यात असे प्रत्येकी दोनच सदस्य सध्या मुंबई उच्च न्यायालयाने नियुक्त केले आहेत. महेश कडूस पाटील यांच्या समवेत सुहानी बागडे यांची सदस्य म्हणून तर चेअरमन पदी न्यायाधीश श्री शंकरराव भडागळे यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाने केली आहे. महेश कडूस पाटील हे नवोदित वकील असूनही त्यांचा सामाजिक प्रदीर्घ अनुभव व त्यांचे विविध शासकीय



लोकसेवांच्या खटल्यातील ज्ञान आणि त्यांचा राज्यघटनेचा अभ्यास व प्राधिकरणाच्या कायदे कार्यपद्धती विषयावरील पकड या बाबी त्यांना या निवड प्रक्रियेत जमेच्या ठरल्या. २००८ साली त्यांनी कृषि पदवीचे शिक्षण पुर्ण केले. दोन वर्षांपूर्वी त्यांनी वकीलीचे शिक्षण पुर्ण केले सध्या ते एम बी ए व एल एल एमचे पदव्युत्तर पदवी पुर्ण करीत असून ते कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात विशेष सरकारी वकील संजय मोरे व ज्येष्ठ वकील जितेंद्र सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली वकीली करीत आहेत.

# मुख्यमंत्र्यांच्या भेटीशिवाय आंदोलन मागे घेणार नाही

## रिंगरोड बाधित शेतकऱ्यांचा इंदिरानगर पोलिस स्टेशनबाहेर दुसऱ्या दिवशीही ठिय्या

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक परिक्रमा मार्ग (रिंगरोड) व हायवे क्र.२९ बाधित शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या नेतृत्वाखाली इंदिरानगर पोलिस स्टेशनबाहेर सुरू असलेल्या ठिय्या आंदोलनाचा आज दुसरा दिवस होता. पाऊस,ऊन आणि प्रतिकूल परिस्थितीची पर्वा न करता शेतकरी व महिला मोठ्या संख्येने आंदोलनस्थळी ठामपणे बसले आहेत.या आंदोलनाला किसान सभा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जाहीर पाठिंबा दिला.किसान सभेचे कॉम्रेड राजू देसले आणि मनसेचे नेते सुदाम कोंबडे राष्ट्रवादी शरद चंद्र पवार गटाचे सुनील कोथमीरे



यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून शेतकऱ्यांना पाठिंबा देत मार्गदर्शन केले. दरम्यान,रिंगरोडच्या प्रश्नामुळे निर्माण झालेल्या नैराश्यातून पिंपळगाव खांब येथील कै.संपत नथु बोराडे,कै.प्रेमा गोपाळ बोराडे आणि कै.रेखा रामदास मुंडे या तीन शेतकऱ्यांचे अनुक्रमे २२,२३ आणि २४ ऑगस्ट रोजी दुःखद निधन झाल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.आंदोलनस्थळी या तिन्ही शेतकऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.या घटनांमुळे आंदोलनकर्त्यांमध्ये तीव्र दुःख व संतापाचे वातावरण असून,शासनाला अजून किती शेतकऱ्यांचे बळी पाहिजेत?" असा सवाल करण्यात आला. नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घडवून आणण्याचे आश्वासन दिले होते.त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी यापूर्वीचे उपोषण मागे घेतले होते. मुख्यमंत्री महोदयांसोबत एक बैठक झाली असली तरी त्यानंतरची अपेक्षित बैठक अद्याप झालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. पालकमंत्र्यांना रक्षाबंधनासाठी वेळ आहे;मात्र न्यायासाठी इंदिरानगर पोलिस स्टेशनबाहेर बसलेल्या शेतकरी महिलांना भेटण्यासाठी वेळ नाही,अशी खंत आंदोलनकर्त्या महिलांनी व्यक्त केली. रक्षाबंधनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राखी बांधून आपल्या घर-संसार आणि शेतीचे रक्षण करण्याचे आवाहन करण्यासाठी शेतकरी महिला मुंबईकडे निघाल्या होत्या.मात्र त्यांना मुख्यमंत्र्यांची भेट घेता आली नाही.त्यामुळे "लाडकी बहीण ही केवळ राजकारण आणि मतांसाठी आहे का? न्याय मागणाऱ्या त्याच लाडक्या बहिणींचा आर्त आवाज शासन कधी ऐकणार?असा सवाल महिलांनी उपस्थित केला. दरम्यान,रिंगरोडच्या भूसंपादन व अलाइनमेंटबाबत शासनाच्या वरिष्ठ स्तरावर चुकीची माहिती दिली जात असल्याचा आरोप शेतकरी प्रतिनिधींनी केला.त्यांच्या म्हणण्यानुसार,प्रत्यक्षात आतापर्यंत झालेली जमीन खरेदी सुमारे १४ टक्केच आहे.या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली.आंदोलनाचा दुसरा दिवस उलटूनही जिल्हाधिकारी किंवा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी येऊन शेतकऱ्यांची विचारपूस न केल्याबद्दलही आंदोलनकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. शेतकरी नेते करण गायकर यांनी सांगितले की,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सक्षम आणि कार्यक्षम नेते असून ते सकारात्मक दृष्टिकोनातून रिंगरोडचा प्रश्न सोडवतील,असा शेतकऱ्यांना आजही विश्वास आहे.मात्र निर्णयास होणारा विलंब आता शेतकऱ्यांच्या जीवावर बेतत आहे.आम्हाला आणखी शेतकरी गमवायचे नाहीत.मुख्यमंत्री महोदयांनी तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांशी चर्चा करावी,असे आवाहन त्यांनी केले.

# दि. 29 ऑगस्ट पासून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**नेवासा : (स. गांवकरी)**

श्रावण मासाच्या निमित्ताने श्री ज्ञानेश्वरी व अमृतानुभव ग्रंथाचे रचनास्थान असलेल्या श्री क्षेत्र नेवासा येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन शनिवार दि.२९ ऑगस्ट ते शनिवार दि.५ सप्टेंबर या कालावधीत करण्यात आले असून या सोहळयाची जय्यत तयारी संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिरामध्ये सुरू झाली आहे. वै.गु.ह.भ.प. बन्सी महाराज तांबे यांचे दिव्य प्रेरणेतून श्रीकृष्ण जयंती व ज्ञानेश्वर महाराज जयंतीच्या निमित्ताने सुरू झालेलता श्री ग्रंधराज ज्ञानेश्वरी



पारायण सोहळ्यास यंदा ६९ वर्षे पूर्ण होत आहेत. या भव्य दिव्य सोहळयाचे नेतृत्व संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख मार्गदर्शक ह.भ.प.वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री हे करत आहे. या सोहळयामध्ये दैनिक पहाटे ४ ते ६ काकडा भजन व आरती, सकाळी ७ ते ११ श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायीक पारायण, दुपारी ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ७ ते रात्री ९ जाहिर हरी कीर्तन,रात्री १० ते पहाटे ४ वाजेपर्यत हरि जागर असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहे. अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने दुपारी ४ ते ५ यावेळेत ह.भ.प. नवनाथ महाराज आगळे, ह.भ.प. गहिनीनाथ महाराज आढाव,हभप कृष्णा महाराज हारदे, हभप राम महाराज खरवंडीकर,ह.भ.प. श्रीहरी महाराज वाकचौरे,ह.भ.प. गुरूवर्य स्वामी भारतानंदगिरीजी महाराज,गंगापूर येथील श्री. विठ्ठल आश्रमाचे महंत हभप रामभाऊ महाराज राऊत यांनी प्रवचनांचे कार्यक्रम होणार आहे सायंकाळी ७ ते ९ यावेळेत होणाऱ्या किर्तन सोहळयात दि.२९ ऑगस्ट रोजी सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत समन्वयाचार्य महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक (नेवासेकर),दि.३० ऑगस्ट रोजी देहू येथील संत तुकाराम महाराज संस्थानचे बापूसाहेब महाराज देहूकर,दि.३१ ऑगस्ट रोजी जळगाव येथील ह.भ.प. गुरुवर्य आधार विठोबा कुमावतजी महाराज,दि.१ सप्टेंबर रोजी बीड येथील ह.भ.प. सत्यवान महाराज लाटे,दि.२ सप्टेंबर रोजी आळंदी येथील ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज कदम (छोटे माऊली),दि.३ सप्टेंबर रोजी आळंदी येथील विद्यावाचस्पती ह.भ.प.डॉ. श्री. रविदासजी महाराज शिरसाठ,दि.४ सप्टेंबर रोजी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख वेदांताचार्य हभप श्री देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांचे श्रीकृष्ण जन्मानिमित्त रात्री १० ते १२ किर्तन होणार आहे.



ठाणे : ठाणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक २९ मधील साबेगाव येथे स्थानिक नागरिकांच्या सोयीसाठी पायवाट आणि गटार तयार करण्याच्या विकासकामाचा शुभारंभ पार पडला. नगरसेविका अर्चना निलेश पाटील यांच्या नगरसेवक निधीतून सदर कामाला सुरुवात करण्यात आली. साबेगावातील तुळशीराम मढवी यांच्या घरापासून ते देविदास पाटील यांच्या घरापर्यंत पायवाट तसेच गटार तयार करण्यात येणार असून सदर कामामुळे परिसरातील नागरिकांची ये-जा अधिक सुलभ होण्याबरोबरच पावसाळ्यातील पाणी व सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होण्यास मदत होणार आहे.

## थोडक्यात बातम्या...

### खड्डेमय रस्त्यामुळे नागरिक त्रस्त



**भिवंडी (स. गांवकरी) :** भिवंडी तालुक्यातील प्रमुख मार्गांपैकी एक असलेल्या भिवंडी-पडघा-आमणे-सावंद-बापगाव रस्त्याची गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालक, प्रवासी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि कामगारांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या रस्त्याचे कायमस्वरूपी सिमेंट काँक्रीटीकरण करून नागरिकांना सुरक्षित व खड्डेमुक्त रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भिवंडी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नितीन चंदे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर मुख्य सचिव , सार्वजनिक बांधकाम विभाग सचिव यांना मंत्रालयात निवेदनाद्वारे केली आहे. तर शासनाच्या सार्वजनिक बांधकाम संबंधित विविध विभागात निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, या रस्त्यावर मागील तीन वर्षांपासून लाखो रुपये खर्च करून विविध कामे करण्यात आली आहेत. मात्र, त्यानंतरही रस्त्यावर वारंवार खड्डे पडत असल्याने या कामांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेषतः पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दररोज या मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. ग्रामीण भागातील नागरिकांना बाजारपेठ, शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये तसेच कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी या मार्गाचा वापर करावा लागतो. त्यामुळे रस्त्याची दुरवस्था ही केवळ वाहनचालकांची समस्या नसून संपूर्ण परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होत आहे.

### सिरसमणी ग्रामपंचायतीत स्वातंत्र्य दिन उत्साहात



**सिरसमणी (स. गांवकरी) :** कळवण तालुक्यातील सिरसमणी ग्रामपंचायतीच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात, देशभक्तीमय वातावरणात आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत सदस्य मा.श्रीमती लताबाई शिवाजी वाघ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीताने देशभक्तीची भावना जागृत केली. या कार्यक्रमास ग्रामपंचायतीच्या सरपंच उखा गांगुर्डे, उपसरपंच प्रशांत वाघ, ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत वाघ,लताबाई वाघ,आलकाबाई नहीरे,मंगलबाई,संजू गांगुर्डे,वंकर, कळसुबाई तसेच ग्रामपंचायत अधिकारी पवार व कर्मचारी उपस्थित होते. सिरसमणी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी व शिक्षक,विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन व संचालक, आरोग्य केंद्रातील कर्मचारी,सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच गावातील सर्वपक्षीय नेते,ज्येष्ठ नागरिक आणि आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने ध्वजवंदनासाठी उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले. देशाची एकता, अखंडता आणि लोकशाही मूल्ये अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी,असा संदेशही यावेळी देण्यात आला. ग्रामपंचायत,शाळा, आरोग्य केंद्र,सहकारी संस्था आणि विविध सामाजिक घटकांच्या सहभागामुळे सिरसमणी येथे स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.गावाच्या विकासासाठी सर्वांनी पक्षभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार करणे हीच स्वातंत्र्य दिनाची खरी प्रेरणा असल्याची भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## भक्त प्रल्हादगिरी महाराजांच्या त्रिदिनात्मक पुण्यतिथी सोहळ्यास ध्वजारोहणाने प्रारंभ

*संत विचाराची कास धरून देशासह धार्मिक वैभव वाढीसाठी प्रयत्न करा : गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज*

**नेवासा : (स. गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील सुरेशनगर-हंडीनिमगावच्या मध्यावर असलेल्या जागृत स्वयंभू त्रिवेणीश्वर महादेव देवस्थानमध्ये महंत श्री रमेशानंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली प.पू.ब्रम्हलिन अजानबाहू भक्त प्रल्हादगिरीजी महाराज यांच्या २८ व्या त्रिदिनात्मक पुण्यतिथी सोहळयास राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या हस्ते धर्म ध्वजारोहणाने बुधवारी भक्तिमय वातावरणात प्रारंभ करण्यात आला. संत विचारांची कास धरून देशासह धार्मिक वैभव वाढीसाठी एकोप्याने प्रयत्न करा असे आवाहन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलतांना केले यावेळी झालेल्या पुण्यतिथी सोहळयाच्या शुभारंभ प्रसंगी गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांचे त्रिवेणीश्वरच्या मुख्य प्रवेशद्वारावर आगमन झाल्यावर महंत



श्री रमेशानंदगिरी बाबांनी स्वागत केले.तर निघालेल्या मिरवणूकीत त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांच्या पथकाने झांज व लेझीम पथकाद्वारे उत्कृष्ट सादरीकरण केले. त्रिवेणीश्वर देवस्थानच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या ध्वजाचे गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज,स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज,अंकुश महाराज जगताप, ज्ञानेश्वर महाराज हजारे,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, बाळू महाराज कानडे,बदाम महाराज पठाडे,श्रीधर महाराज अनुभुले, गणेश महाराज शेजुळ,प्रमोद महाराज रोकडे,हंडीनिमगावचे सरपंच भिवाजीराव आघाव, सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ,उद्योजक महेंद्र पवार,उद्योजक सुरेशराव उभेदळ,जनार्धन पटारे,गोमाता मूर्तीकार आकाश जामदार, बाळासाहेब साळुंके,विठ्ठल पाषाण,संभाजीराव मते, रावसाहेब घुमरे,संतसेवक मनोहर जाधव,गोरक गुंजाळ,यांच्या प्रमुख उपस्थितीत वेदमंत्राच्या जयघोषात ध्वज पूजनाद्वारे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांच्या हस्ते मंदिर प्रांगणात उभारण्यात आलेल्या गोमातेच्या पुतळयाचे पूजन करून भाविकांच्या दर्शनासाठी लोकार्पण केले. त्रिवेणीश्वर शिवलिंगासह योगीराज भक्त प्रल्हादगिरी महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले. परिसरातील विकासात्मक कामांची त्यांनी पहाणी केली.सभामंडपामध्ये झालेल्या कार्यक्रम प्रसंगी महंत श्री रमेशानंदगिरीजी बाबांच्या हस्ते गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांचे संतपूजन करण्यात आले. यावेळी बोलताना गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज म्हणाले की जागृत असलेल्या अजानबाहू भक्त प्रल्हादगिरी बाबांनी हे क्षेत्र निर्जन स्थळ असतांना येथे वास्तव्य केले.संतांचे पाय जेथे लागतात ती भूमी पवित्र होते त्याच पद्धतीने त्रिवेणीश्वरची ही भूमी पवित्र झाली आहे.

## नवी मुंबई एमआयडीसी रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य; प्रशासनाचे दुर्लक्ष!



**नवी मुंबई : (स. गांवकरी)**

नवी मुंबई एमआयडीसी परिसरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालक आणि नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांच्या दुरवस्थेकडे नवी मुंबई महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दैनिक समर्थ गावकरीचे मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांनी अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. त्यांनी रस्त्यावरील खड्ड्यांची बेल वाजवून, फुले वाहून खड्ड्यांची पूजा केली तसेच खड्ड्यांभोवती रांगोळी काढून प्रशासनाचा निषेध नोंदविला. या अनोख्या आंदोलनातून प्रशासनाचे लक्ष रस्त्यांच्या दुरवस्थेकडे वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला असून, वाहनांचे नुकसान तसेच वाहतूक कोंडीची समस्याही निर्माण होत आहे. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने तातडीने रस्त्यांची पाहणी करून खड्डे बुजवावेत आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी विष्णू बुरे यांनी केली आहे. “खड्डे बुजवण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. नागरिकांच्या जीवाशी खेळ होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी,” अशी मागणीही करण्यात आली.

## शासकीय कार्यालयांत बायोमेट्रिक हजेरीसह शिस्तभंगाला प्रशासनाचा ‘ब्रेक’

**ठाणे, कल्याण : (स. गांवकरी)**

शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांनी वेळेचे पालन करावे, कार्यालयीन शिस्त राखावी आणि बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थिती नोंदवावी, यासाठी सामाजिक कार्यकर्ते विशाल शांताराम कुरकुटे यांनी केलेल्या पाठपुराव्याला आता प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. त्यांच्या नावाने संदर्भ देत पंचायत समिती कल्याणच्या गटविकास अधिकाऱ्यांनी २५ ऑगस्ट २०२६ रोजी महत्त्वाचे परिपत्रक जारी केले आहे. त्यामुळे या प्रश्नाला आता अधिकृत प्रशासकीय स्वरूप प्राप्त झाले आहे.

विशाल कुरकुटे यांनी शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती, कार्यालयीन वेळेचे पालन आणि बायोमेट्रिक हजेरी यासंदर्भात प्रशासनाकडे प्रश्न उपस्थित केला होता. परिपत्रकात त्यांच्या निवेदनाचा तसेच यापूर्वीच्या पत्रव्यवहाराचा संदर्भ स्पष्टपणे देण्यात आला आहे. कार्यालयीन कामकाजाबाबतच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. परिपत्रकानुसार,




शासकीय कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेचे पालन करणे आणि बायोमेट्रिक मशीनवर उपस्थिती नोंदवणे आवश्यक आहे. वर्ग-१ संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.४५, तर वर्ग-३ संवर्गासाठी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी कार्यालयीन वेळ नमूद करण्यात आली आहे. निर्धारित वेळेचे पालन न करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर नियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, कंत्राटी कर्मचारी तसेच विविध शासकीय योजनांमध्ये कार्यरत असलेल्या काही कर्मचाऱ्यांनी बायोमेट्रिक मशीनवर उपस्थिती नोंदवलेली नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा सर्व कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक नोंदणी करून दररोजची उपस्थिती नोंदविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बायोमेट्रिक उपस्थितीच्या आधारे मासिक वेतनाबाबतची कार्यवाही करण्याची सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे.

## उत्तर महाराष्ट्रात प्रथमच! मिनिमली इन्व्हेसिव्ह हार्ट सर्जरीनंतर अवघ्या २४ तासांत रुग्णाला डिस्चार्ज

### १८ वर्षीय रिया मोगलवर छातीचे हाड न कापता यशस्वी हृदयशस्त्रक्रिया

**नाशिक : (स. गांवकरी)**

जन्मजात हृदयरोगाने त्रस्त असलेल्या १८ वर्षीय रिया मोगल हिच्यावर अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आधुनिक मिनिमली इन्व्हेसिव्ह ओपन हार्ट सर्जरी यशस्वीपणे करण्यात आली. विशेष म्हणजे, या प्रकारच्या शस्त्रक्रियेनंतर उत्तर महाराष्ट्रात प्रथमच अवघ्या २४ तासांच्या आत रुग्णाला डिस्चार्ज देण्यात आला आहे. रियाला Sinus Venosus Atrial Septal Defect (ASD) with Partial Anomalous Pulmonary Venous Connection (PAPVC) हा जन्मजात हृदयरोग होता. या आजारामध्ये हृदयातील वरच्या कप्प्यांमधील पडद्याला छिद्र असण्यासोबतच फुफ्फुसातून येणारी रक्तवाहिनी हृदयाला असामान्य ठिकाणी जोडलेली असते.

या आजारासाठी पारंपरिक पद्धतीने ओपन हार्ट सर्जरी करावी लागू शकते. मात्र, रियाच्या बाबतीत आधुनिक मिनिमली इन्व्हेसिव्ह ओपन हार्ट सर्जरीचा पर्याय निवडण्यात



आला. या प्रक्रियेत छातीचे मध्यवर्ती हाड म्हणजेच sternum (breastbone) कापण्यात आले नाही. छातीच्या उजव्या बाजूने दोन बरगड्यांच्या मधून छोट्या छेदाद्वारे शस्त्रक्रिया करण्यात आली.

या पद्धतीमुळे मोठी जखम टाळता आली असून लहान व कॉस्मेटिक व्रण, कमी वेदना, कमी रक्तस्राव, संसर्गाचा तुलनेने कमी धोका आणि जलद रिकव्हरी असे फायदे मिळतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, शस्त्रक्रियेनंतर रियाची प्रकृती स्थिर राहिली आणि २४ तासांच्या आत तिला डिस्चार्ज देण्यात आला. बारावीच्या शिक्षणाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर असलेल्या रियासाठी ही जलद रिकव्हरी विशेष महत्त्वाची ठरली आहे.

याबाबत डॉ. प्रणव माळी यांनी सांगितले, “निवडक रुग्णांमध्ये मिनिमली इन्व्हेसिव्ह तंत्रज्ञानामुळे पारंपरिक ओपन हार्ट सर्जरीच्या तुलनेत शस्त्रक्रियेनंतरचा त्रास कमी करण्यास आणि रुग्णाच्या रिकव्हरीला गती देण्यास मदत होते. रियाच्या बाबतीत शस्त्रक्रियेनंतरची तिची रिकव्हरी अत्यंत समाधानकारक झाली आणि वैद्यकीय निकषांनुसार २४ तासांच्या आत तिला घरी पाठवता आले.” अशोका मेडिकव्हरमध्ये आम्ही केवळ उपचार देण्यापेक्षा रुग्णाला सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सुरक्षित उपचार अनुभव देण्यावर सातत्याने भर देत आहोत. रिया मोगलवरील ही शस्त्रक्रिया त्याचे उत्तम उदाहरण आहे. या यशस्वी शस्त्रक्रियेसाठी डॉ. प्रणव माळी यांच्या नेतृत्वाखाली डॉ. शर्वरी – ॲनेस्थेसियोलॉजिस्ट, विवेक पॉल – परफ्युजनिस्ट, समाधान आणि विशाल – असिस्टंट्स, तसेच ICU टीम यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. शस्त्रक्रियेपासून पोस्ट-ऑपरेटिव्ह केअरपर्यंत संपूर्ण टीमच्या समन्वयामुळे रियाची रिकव्हरी अत्यंत जलद आणि सुरळीत झाली.

# मा. मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते मविप्र कृषी महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्या उद्‌घाटन

### मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**नाशिक : (स. गांवकरी)**

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संस्थेतर्फे सन 2003 साली नाशिक शहरात सुरू करण्यात आलेल्या कृषी महाविद्यालयाचे कालांतराने ‘कर्मयोगी दुलाजी सिताराम पाटील कृषी महाविद्यालय’ असे नामकरण करण्यात आले. सदर कृषी महाविद्यालय हे नुकतेच दिंडोरी तालुक्यातील नाशिक-पेठ महामार्गावरील मौजे चाचडगाव येथील प्रशस्त इमारतीत स्थलांतरित करण्यात आले आहे. येथील महाविद्यालयाची मुख्य इमारत, मुलांचे व मुलींचे वसतीगृह अशा तीनही भव्य इमारतींचा उद्घाटन सोहळा महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवार दिनांक 28 ऑगस्ट 2026 रोजी संपन्न होत आहे, अशी माहिती मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मविप्र संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेस मविप्रचे सभापती मा. श्री. बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष मा. श्री. विश्वासराव मोरे व सर्व शिक्षणाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रम नाशिकचे पालकमंत्री मा. ना. श्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, अन्न व नागरी पुरवठामंत्री मा. ना. श्री छगन भुजबळ, शालेय शिक्षणमंत्री मा. ना. श्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री मा. ना. श्री नरहरी झिरवाळ, कृषि मंत्री मा.ना. श्री. दत्तात्रय भरणे, राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. विलास खर्चे यांच्यासह नाशिक जिल्ह्यातील माननीय खासदार व माननीय आमदार, नाशिक महापालिकेच्या महापौर श्रीमती हिमगिरी आहेर-आडके व उपमहापौर मा. श्री. विलास शिंदे यांच्या प्रमुख




उपस्थितीत होणार आहे. याप्रसंगी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संस्थेचे सरचिटणीस मा. श्री ॲड. नितीन ठाकरे, सभापती मा. श्री. बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष मा. डॉ. श्री. सुनील ढिकले, उपाध्यक्ष मा. श्री. विश्वासराव मोरे, उपसभापती मा. श्री. डी. बी. मोगल, चिटणीस मा. श्री. दिलीप दळवी, दिंडोरी तालुका संचालक मा. श्री. प्रवीण जाधव आणि मविप्र समाज समस्त कार्यकारी मंडळ, शिक्षणाधिकारी, सभासद, सेवक व विद्यार्थी यांची उपस्थिती असेल. नाशिक जिल्हा हा फळे, फुले आणि भाजीपाला उत्पादनात महाराष्ट्रात अग्रेसर आहे. या जिल्ह्याची कृषी शिक्षणाची गरज व निकड या बाबींचा विचार करून मविप्र संस्थेने १ नोव्हेंबर २००३ पासून महात्मा फुले कृषी विद्यापीठ मान्यताप्राप्त व संलग्नित कृषी महाविद्यालयाची सुरुवात करून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांकरिता कृषी शिक्षणाची कवाडे खुली केली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा व्हावा व विद्यार्थ्यांना शेती क्षेत्रावर प्रत्यक्ष काम करता यावे, या उद्देशाने शहरातील कृषी महाविद्यालय दिंडोरी तालुक्यातील नाशिक-पेठ महामार्गावरील मौजे चाचडगाव येथे स्थलांतरित करण्यात आले. तब्बल १४ एकर जागेवर उभारण्यात आलेल्या याच प्रशस्त अशा महाविद्यालयाच्या इमारतीचे उद्‌घाटन मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती ठाकरे यांनी दिली. विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासाठी १०९ एकर जमीन क्षेत्र तयार करण्यात आले आहे. तसेच १४ एकर कॅम्पसमध्ये प्रशासकीय इमारत, मुला-मुलींचे सुसज्ज वसतीगृह उभारण्यात आले आहे. ज्यामध्ये प्राचार्य कार्यालय, प्रशासकीय विभाग, सुसज्ज असे भव्य ग्रंथालय, ई-लायब्ररी, स्पर्धा परीक्षा मंच, सर्व १० विभागांच्या सुसज्ज, अद्ययावत परिपूर्ण अशा प्रयोगशाळा व शिक्षण साहित्य साधनांनीयुक्त व्याख्यान कक्ष, स्वतंत्र संगणक प्रयोगशाळा, वायफाय व इंटरनेट सुविधा उपलब्ध आहेत. चार वर्षांच्या बीएससी कृषी पदवी असलेल्या या कृषी महाविद्यालयाची प्रवेशक्षमता प्रतिवर्ष १२० विद्यार्थी इतकी आहे. याच कॅम्पसमध्ये मराठी माध्यमाचे कृषी विद्यालय व इंग्रजी माध्यमाचे कृषी तंत्रनिकेतन विद्यालयसुद्धा सुरू आहेत. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांनी महाविद्यालयातील सर्व सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता तपासून महाविद्यालयास सन २०२२-२३ मध्ये ‘अ’ दर्जा प्रदान केला आहे. तसेच, सन २०२४ मध्ये ‘कृषीभूषण महाराष्ट्र एफपीओ फेडरेशन’ यांच्यातर्फे महाविद्यालयास ‘कृषीभूषण-२०२४’ हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. ‘KRUSHITHON 2024’ मध्ये ‘प्रयोगशील कृषी महाविद्यालय’ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य

डॉ. बापूसाहेब भाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण १० विभागांचे प्रमुख, २८ शिक्षक व ४४ शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. कृषी क्षेत्रात संशोधन आणि नवीन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे, यावर महाविद्यालयाचा जास्त भर आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २५४ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार दि. २७ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## महाराष्ट्राच्या ‘ग्रोथ इंजिन’ला ‘एमएसएमई’ क्षेत्राची ताकद मिळणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### ४९ ’एमएसएमई’च्या सामंजस्य करारातून २,३२० कोटींची गुंतवणूक प्रस्तावित

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

चाकण-भोसरीच्या औद्योगिक पट्ट्याला नवी ऊर्जा देणाऱ्या ४९ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसोबतच्या (एमएसएमई) सामंजस्य कराराच्या माध्यमातून २ हजार ३२०.९७ कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. या गुंतवणुकीतून उत्पादनक्षमता वाढण्यासोबतच हजारो रोजगारांच्या नव्या संधी निर्माण होतील आणि ग्रोथ इंजिन असणाऱ्या पुणे परिसरातील औद्योगिक परिसंस्थेला आणखी बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृह येथे हा कार्यक्रम झाला. यावेळी उद्योग (गुंतवणूक व सेवा विभाग) आणि मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाह, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उद्योग विभागाचे अवर सचिव विनोद मेंढे, आयुक्त (एमएसएमई) प्रेरणा देशभ्रतार, विशेष आयुक्त (मैत्री) वैभव वाघमारे तसेच वरिष्ठ अधिकारी आणि कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

- **चाकण-भोसरीच्या औद्योगिक भरारीला नवी झेप**
- **उत्पादनवाढीसह रोजगारांच्या संधी**

‘एमएसएमई’च्या बळावर महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला नवी गती मिळणार

महाराष्ट्र हे देशाचे ‘ग्रोथ इंजिन’ असून, देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासात राज्याची भूमिका महत्त्वाची आहे. मोठ्या उद्योगांसाठी आवश्यक घटक, सुटे भाग, सेवा आणि विविध उत्पादनांचा पुरवठा करण्याबरोबरच स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीत एमएसएमई क्षेत्राचा मोठा वाटा आहे. त्यामुळे मोठ्या उद्योगांच्या विस्तारामागे एमएसएमई क्षेत्र मजबूत आधारस्तंभ म्हणून उभे आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पुणे आणि परिसरातील ऑटोमोबाईल व अभियांत्रिकी उद्योगांच्या परिसंस्थेत एमएसएमई उद्योगांची भूमिका महत्त्वाची आहे. अनेक उद्योग आपल्या घटकांची आणि सेवांची मोठ्या प्रमाणावर स्थानिक एमएसएमईंकडून खरेदी करतात. अनेक उत्पादनांच्या आयातीला पर्याय निर्माण करून ‘लोकल टू ग्लोबल’ वाटचालीला चालना देण्याचे काम एमएसएमई क्षेत्र करत आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या वाटचालीत आज आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला.

## संरक्षण क्षेत्रात मोठा निर्णय :

## मोदी सरकारकडून १५०० किमी पल्ल्याच्या क्षेपणास्त्र निर्मितीसाठी खासगी कंपन्यांना हिरवा कंदील!

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

भारताच्या संरक्षण क्षमतेला अधिक मजबूत करण्यासाठी मोदी सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिलेल्या मान्यतेनुसार, आता देशातील खाजगी कंपन्या देखील ’डीआरडीओ’ (DRDO) च्या तंत्रज्ञानाचा वापर करून अत्याधुनिक क्षेपणास्त्रांची निर्मिती करू शकतील. या निर्णयाचा पुढील टप्पा म्हणून सरकार आता १५०० किलोमीटरपर्यंत मारा करण्याची क्षमता असणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या निर्मितीसाठी खाजगी भागीदारांची निवड करत आहे.

दीर्घ पल्ल्याची क्षेपणास्त्रे आता भारतातच तयार होणार

या नवीन धोरणांतर्गत, १००० ते १५०० किलोमीटर पल्ला असणारे ’लाँग रेंज लँड अटॅक क्रूझ मिसाईल’ (LRL-CM) आणि १५० ते ५०० किमी पल्ल्याचे ’प्रलय’ हे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आता खाजगी क्षेत्रातील कंपन्यांद्वारे बनवले जाईल. डीआरडीओ (DRDO) आपले तंत्रज्ञान या कंपन्यांना हस्तांतरित करणार असून, त्यामुळे देशांतर्गत उत्पादन वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

हवाई सुरक्षेसाठी अस्त्र क्षेपणास्त्रांचे उत्पादन वेगाने होणार

हवेतल्या हवेत शत्रूच्या विमानांचा वेध घेणाऱ्या ’अस्त्र मार्क-१’ (११० किमी) आणि ’अस्त्र मार्क-२’ (१५० किमी)



या क्षेपणास्त्रांच्या निर्मितीसाठी प्रस्ताव जारी करण्यात आले आहेत. या कामात भारतातील आघाडीच्या खाजगी आणि सरकारी कंपन्या एकत्र येऊन काम करतील. या प्रमुख क्षेपणास्त्रांच्या निर्मितीत खाजगी कंपन्यांचा सहभाग असणार आहे. भारताच्या संरक्षण क्षमतेत वाढ करण्यासाठी विविध अत्याधुनिक क्षेपणास्त्रे आणि शस्त्रप्रणाली विकसित केल्या जात आहेत.

## अहिल्यानगरमध्ये भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवाची भव्य शोभायात्रा



**अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)**

भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवा निमित्त बागडपट्टी येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिरापासून भव्य सवाद्य मिरवणुकीला प्रारंभ झाला.ही मिरवणूक नेता सुभाष चौक,चौपाटी कारंजा मार्गे दिल्ली गेट येथील पटांगणावरील श्री जिव्हेश्वर मंदिरात महाआरती करून सिद्धी बाग,नवरंग व्यायाम शाळा,बागडपट्टी येथे समारोप करण्यात आला.

- **पारंपारिक पद्धतीने तुतारीच्या निनादात स्वागत**
- **बाल वारकरी, शाळकरी मुलींचे शिवतांडव ठरले मुख्य आकर्षण**

पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेल्या या मिरवणुकीच्या अग्रभागी भगवान श्री जिव्हेश्वर यांचा चित्ररथ होता.नवनाथ शिक्षण संस्थेच्या बाल वारकऱ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात ’ज्ञानोबा माऊली तुकाराम’ चा जयघोष करीत भजन सादर केले.संस्कृती श्रीनिवास कनोरे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शंकर-पार्वती तसेच शिवभक्त गण यांच्या वेशभूषा करून सादर केलेले शिवतांडव नृत्य,बाल गोपाळांसाठी मोटू,पतलू हे मुख्य आकर्षण ठरले.तसेच महिलांनी फुगडीचा फेर धरून उत्सवात रंगत आणली.या मिरवणुकीतील सर्व समाज बांधवांनी भगवी टोपी व पंचा परिधान केले होते.

पारंपारिक पद्धतीने तुतारीच्या निनादात या मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले.यावेळी महापौर ज्योतीताई गाडे व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप यांनी भगवान श्री जिव्हेश्वर पालखीचे दर्शन घेतले. या मिरवणुकीत स्वकुळ हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, माजी उपमहापौर दीपक सूळ, खजिनदार गजेंद्र सोनवणे, सचिव विजय मानकर, कार्याध्यक्ष लक्ष्मीकांत तरोटे, विश्वस्त जितेंद्र लांडगे, संजय सागावकर, बाबासाहेब वैद्य, अभिजीत अष्टेकर, उत्सव समितीचे प्रमुख निरज चांगटे, निरंजन पाठक, उमेश कोदे, चंद्रकांत मानकर, सचिन मडके, प्रशांत मडके, सुनील पावले, अविनाश पावले, काशिनाथ पाठक, सुरेंद्र सोनवणे, प्रवीण जुंदरे, किशोर विंचुरकर, सुरेश इंगळे, प्रसाद कांबळे, संजय दळवी, सोमनाथ खाडे, प्रताप मारवाडे, उल्हास ढोरे, अनिल भंडारे, सचिन पावले, नरेंद्र सोनवणे, विठ्ठल पाठक, शैलेश नगरकर, प्रसाद मडके, निरज सागांवकर, सुधाकर दळवी, मयुर बोचुघोळ, श्रीकांत शेकटकर, विश्वास पाटेकर, गणेश मारवाडे, सुभाष डफळ, निलेश मिसाळ, सचिन कांबळे आदींसह स्वकुळसाळी महिला मंचच्या अध्यक्षा श्रीमती छाया साळी, सौ. वनिता पाटेकर, सुरेखा शेकटकर, मृणाल कनोरे, शुभदा वल्ली, स्नेहा पाठक, नुतन पाठक, शैला मानकर, वैशाली येवलेकर, जयश्री कोदे, आरती पाठक, श्रीमती मनिषा चांगटे, मुख्याध्यापिका कल्पना भामरे, स्वाती बागडे, ऋतुजा धोत्रे, पल्लवी कनारे, माधुरी खडामकर, वनिता मानकर, अनिता मानकर, अनिता कांबळे, कल्याणी पावले, शितल सागांवकर, अमृता कांबळे, पुष्पा खाडे, लता सागांवकर आदींसह स्वकुळसाळी समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साखरपुड्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

### नगरमध्ये तरूणाविरूध्द गुन्हा दाखल

**अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)**

साखरपुडा झाल्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून तरूणीच्या इच्छेविरूध्द तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा, तसेच नंतर मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तरूणीने केला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आकाश दिनेश राठोड (रा. नाना पाटील तालीम शेजारी, नालेगाव, अहिल्यानगर) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित तरूणीने सोमवारी (२४ ऑगस्ट) फिर्याद दिली आहे.

फिर्यादी तरूणी (वय २९) ही अहिल्यानगर शहरात आजीसोबत राहत असून खासगी नोकरी करून उदरनिर्वाह करते. तिच्या फिर्यादीनुसार, २२ मे २०२६ रोजी दुचाकी दुरूस्तीसाठी ती माणिकनगर येथील शोरूममध्ये गेली होती. त्यावेळी तिची आकाश राठोड याच्याशी ओळख झाली. त्याने तिचा मोबाईल क्रमांक घेतल्यानंतर दोघांमध्ये बोलणे सुरू झाले. फिर्यादीने आकाशला यापूर्वी आपल्यावर अत्याचार झाल्याचा व गुन्हा दाखल असल्याची माहिती दिली होती. ही बाब माहिती असूनही आकाश तिच्याशी संपर्कात राहिला. त्यानंतर त्याने लग्नाचा प्रस्ताव दिला आणि तरूणीनेही त्यास होकार दिला. ५ जुलै २०२६ रोजी बुर्हानगर येथे आकाशच्या नातेवाईकाच्या घरासमोर दोघांचा साखरपुडा झाला. त्यामुळे दोघांचे एकमेकांच्या घरी येणे-जाणे वाढले.

तरुणीच्या आरोपानुसार, १५ जुलै रोजी आकाश तिला नालेगाव येथील त्याच्या घरी घेऊन गेला. तेथे त्याने शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तरूणीने त्याला नकार दिला असतानाही त्याने लग्नाचे व प्रेमाचे आमिष दाखवले आणि तिच्या इच्छेविरूध्द शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यानंतर १७ जुलै ते २६ जुलैदरम्यानही आकाशने तिच्यासोबत वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. काही दिवसांनी आकाशचे दुसर्या मुलीसोबत प्रेमसंबंध असल्याचे तरूणीला समजले. याबाबत तिने आकाशला विचारणा केली असता त्याने मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची आणि आत्महत्या करून तुला अडकवण्याची धमकी दिल्याचा आरोपही तिने केला आहे.

## ‘रॅपिडो’शी व्यावसायिक संबंधांचे पुरावे द्या!

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे संजय राऊतांना प्रत्युत्तर; प्रत्येक गोष्टीला राजकीय रंग देणे योग्य नाही

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

‘रॅपिडो’शी काही मंत्र्यांच्या आर्थिक आणि व्यावसायिक संबंध असल्याचा तसेच कार्यक्रमांना प्रायोजकत्व मिळाल्याचा आरोप करणाऱ्या संजय राऊतांनी यासंदर्भात ठोस कागदपत्रे आणि पुरावे सादर करावेत, असे आव्हान मंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी दिले. प्रत्येक गोष्टीला राजकीय रंग देण्यापेक्षा वस्तुस्थिती समजून घेण्याचे आवाहन त्यांनी राऊतांना पत्र लिहून केले आहे. संजय राऊत यांनी अलीकडेच परिवहन विभागाला पत्र लिहून बाईक टॅक्सीच्या निर्णयामुळे हजारो रिक्षाचालकांच्या रोजगारावर संकट येईल, असा दावा केला होता. तसेच या प्रकरणात मंत्र्यांवर संशय व्यक्त केला होता. या पत्राला सविस्तर उत्तर देताना मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले की, रिक्षाचालकांच्या प्रश्नांवर राजकारण करणे योग्य नाही. बाईक टॅक्सीमुळे एकीकडे तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी मिळणार आहेत, तर दुसरीकडे पारंपरिक रिक्षाचालकाचा रोजगार आणि सामाजिक सुरक्षा सुरक्षित ठेवणे हीदेखील सरकारचीच जबाबदारी आहे. ही दोन्ही चाके समतोलपणे चालवावी लागतील, असे त्यांनी नमूद केले.

रॅपिडो असो किंवा कोणतीही अन्य कंपनी, सरकारपेक्षा मोठे कोणीही असू शकत नाही आणि नियमांपेक्षा वरचे स्थान कोणालाही दिले जाणार नाही, असे स्पष्ट करत सरनाईक म्हणाले की, परिवहन विभागाचे निर्णय कोणत्याही ओळखीवर नव्हे तर कायदेशीर नियमांवर चालतात. तसेच संजय राऊत यांनी नाशिक ते मंत्रालय काढलेल्या मोर्च्याच्या भूमिकेवर बोलताना, आंदोलनाला परवानगी नाकारली



असेल तर त्यामागची प्रशासकीय कारणे तपासणे गरजेचे असल्याचे त्यांनी सुचवले. रिक्षाचालकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी हवे तर ’सामना’च्या कार्यालयातही यायला तयार असल्याचे सांगत, राजकारण कमी आणि वस्तुस्थितीवर अधिक चर्चा करूया, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

## मराठी न येणा-या रिक्षा टॅक्सी चालकांचे परवाने रद्द करु नका : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

### गरीब परप्रांतीय रिक्षा टॅक्सी चालकांना राज्यातून चालते व्हा म्हणाण्याची भूमीका संवाधिाना ला छेद देणारी

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाचा परिवहन मंत्रालयाने रिक्षा टॅक्सी चालकांनी मराठी भाषा शिकली पाहिजे. याबाबतचा निर्णय केला त्याचा आम्ही पूर्ण विरोध करत नाही. मराठी भाषा ही आपली भाषा आहे. मराठी भाषा रिक्षा टॅक्सी चालकांनी शिकली पाहिजे. ज्या रिक्षा टॅक्सी चालकांना मराठी येत नाही, त्यांना शिकण्याची संधी दिली पाहिजे. परंतु मराठी भाषा येत नाही म्हणून रिक्षा टॅक्सी चालकांचे परवाने रद्द करून त्यांच्या पोटावर पाय देऊ नये. अशी रिपब्लिकन पक्षाची मागणी आहे. अशी भुमिका रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी बांद्रा येथील संविधान निवासस्थानी पत्रकार परिषदेत स्पष्ट केली.

संविधान निवासस्थानी शेकडो रिक्षा चालक ना.रामदास आठवले यांची भेट घेण्यास आले होते. त्यावेळी रिक्षा चालकांशी संवाद साधतांना मराठी भाषा रिक्षा चालकांनी शिकलीच पाहिजे असे आवाहन केले .आम्ही मराठी शिकणार नाही अशी उद्दाम भुमिका रिक्षा टॅक्सी चालकांनी घेऊ नये असे सांगत मराठी भाषा शिकण्याचा प्रयत्न करा असा सल्ला ना.रामदास आठवले यांनी रिक्षा टॅक्सी चालकांना दिला .

परप्रांतीयांना मराठी भाषा येत नाही. त्यांनी महाराष्ट्रातुन चालते व्हावे या अर्थाचे बॅनर मनसेकडुन लावण्यात आले होते. ही भुमिका चुकीची असल्याचे ना. रामदास आठवले यांनी सांगितले. मुंबई भारत देशाची आर्थीक राजधानी आहे. देशभरातील सर्व नागरीक या मुंबईत राहतात. भारतीय संविधानाने कोणत्याही राज्यात जावुन उपजिवीका करण्याचा अधिकार दिला आहे. ज्यांना मराठी येत नाही त्यांनी राज्यातुन चालते व्हा, ही भुमिका संविधानाला छेद देणारी भुमिका आहे. संविधान विरोधी भुमिका आहे. मुंबईत अनेक परप्रांतीय मोठे व्यापारी आहेत. जसे मराठीत किर्लोस्कर व्यापारी आहेत त्याप्रमाणे मुंबईमध्ये टाटा, बिर्ला, अदाणी, अंबानी हे सुध्दा उद्योजक आहेत. परंतु गरीब रिक्षाचालक पोट भरायला आलेल्या परप्रांतीयांना चालते व्हा म्हणणे चुकीचे आहे. मुंबईमध्ये सर्व भारताचे लोक राहतात. रिक्षाचालकांना, गरीब परप्रांतीयांना चालते व्हा म्हणण्याची भुमिका ही चुकीची आहे. संविधानाला छेद देणारी भुमिका आहे. असे ना. रामदास आठवले यावेळी म्हणाले.

मराठी भाषा शिकलीच पाहिजे. मराठी भाषेचा आम्हाला अभिमान आहे. रिक्षाचालकांना मराठी



भाषा शिकण्याची संधी दिली पाहिजे. मुदतीत वाढ पाहिजे. परवाने रद्द करुन या गोरगरीब रिक्षा चालकांच्या पोटावर पाय देवू नये त्यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून रिक्षा टॅक्सी चालकांचे परवाने रद्द करु नये अशी मागणी करणार आहोत. मला भेटायला आलेल्या रिक्षा चालकांना मराठी भाषा शिकण्याचा सल्ला दिलेला आहे. त्यांना मराठी भाषा शिकण्यासाठी मुदत वाढवुन द्यावी, त्यांचे परवाने रद्द करु नये हीच आपली भुमिका आहे. परिवहनमंत्री यांनी घेतलेल्या भूमिकेला आमचा विरोध नाही, मराठी शिकले पाहिजे. परंतु रिक्षा चालकांचे परवाने रद्द करण्याची भुमिका राज्य शासनाने घेवू नये.

## बहिण -भावाच्या रक्षा बंधनाला महागाईची झळ

**अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)**

श्रावण महिना लागताच सणांची रेलचेल सुरू होते बहिण भावाच्या प्रेमळ नात्याच श्रणानुबंध जपणारा सन म्हणजे रक्षाबंधन मात्र यंदा भावा बहिणीच्या प्रेमाचे प्रतीक असणारी राखी यंदा २० ते २५ टक्क्यांनी महागली असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले रक्षाबंधनानिमित्त शहरात तीन बाजारपेठ गर्दीने फुलून गेली आहे. भाऊरायाच्या पसंतीस उतरेल अशी राखी घेण्यासाठी महिलांनी बाजारात गर्दी केली होती तर दुसरीकडे आपल्या बहिणीसाठी भेटवस्तू खरेदी करताना युवा वर्ग दिसत आहे अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या रक्षाबंधनानिमित्त विविध बाजारपेठेत आकर्षक राख्या विक्री दाखल झाले आहेत महिलांना या राख्या भरत आहे बहीण भावाच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेला सण रक्षाबंधन २८ ऑगस्टला साजरा होणार आहे मात्र यंदा महागाईमुळे दरांमध्ये काही काही प्रमाणात वाढ झाल्याने राख्या विक्रेत्यांकडून सांगण्यात आले कमीत कमी पाच ते दहा रुपयापासून ५५० ते ६०० रुपये किमतीच्या विविध प्रकारच्या राख्या रक्षाबंधन निमित्त बाजारपेठेत उपलब्ध आहेत महिलांकडून राख्यांच्या दुकानात खरेदी झाली गर्दी केली जात आहे यंदा राख्यांची मागणी वाढली आहे यावर्षी राख्यांच्या किमतीत काहीशी वाढ झाली आहे मात्र तरीही साठी महिला वर्ग दुकानात गर्दी करत आहेत त्यामुळे यावर्षीही बाजारपेठेत सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे.

# सर्वकष प्राथमिक आरोग्य सेवा प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत वासिंद येथे राज्यस्तरीय मार्गदर्शकांचे मार्गदर्शन

## प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण व लोककेंद्रित करण्यावर भर



**ठाणे (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'सर्वकष प्राथमिक आरोग्य सेवा (ऊेािशहशपीळींश झीळारीू कशरश्रींह उरीश – उझकउ) प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, वासिंद, जिल्हा ठाणे येथे राज्यस्तरीय मार्गदर्शकांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. यावेळी प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी, प्रशिक्षणाची गुणवत्ता, प्रशिक्षणार्थींचा सहभाग तसेच प्रशिक्षणातून अपेक्षित परिणाम याबाबत आढावा घेण्यात आला.

या प्रसंगी राज्यस्तरीय मार्गदर्शक डॉ. मोहन जाधव, माजी सहसंचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच प्राचार्य डॉ. शुमा राठोड यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, वासिंद येथील प्रशिक्षण केंद्रास भेट दिली. त्यांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधून प्रशिक्षणाच्या विविध बाबींची माहिती घेतली. तसेच प्रशिक्षणादरम्यान देण्यात येणारे मार्गदर्शन, प्रशिक्षणार्थींचा सहभाग आणि प्रशिक्षणातून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाचा प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजात होणारा उपयोग याबाबत चर्चा केली.

नागरिकांना त्यांच्या निवासस्थानाच्या जवळच सर्वसमावेशक, गुणवत्तापूर्ण, प्रतिबंधात्मक तसेच उपचारात्मक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हा सर्वकष प्राथमिक आरोग्य सेवेचा महत्त्वपूर्ण उद्देश आहे. प्राथमिक आरोग्य स्तरावर नागरिकांच्या विविध आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी आरोग्य क्षेत्रात कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ज्ञान, कौशल्य आणि कार्यक्षमता अधिक सक्षम करणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक ज्ञान व कौशल्ये उपलब्ध करून देण्याबरोबरच प्राथमिक आरोग्य सेवेकडे लोककेंद्रित आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता विकसित करण्यासाठी उझकउ प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

प्राथमिक स्तरावरच नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या ओळखणे, आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, योग्य आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे तसेच गरजेनुसार रुग्णांना पुढील स्तरावरील आरोग्य संस्थेकडे संदर्भित करणे या बाबींमध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून ही भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडण्यासाठी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

यावेळी डॉ. मोहन जाधव यांनी प्राथमिक आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवांचा लाभ पोहोचविण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक असून, आरोग्य कर्मचाऱ्यांनी नागरिकांशी प्रभावी संवाद साधून त्यांच्या आरोग्यविषयक गरजा समजून घेण्यावर भर द्यावा, असे त्यांनी नमूद केले.

आरोग्य सेवा ही केवळ उपचारांपुरती मर्यादित न ठेवता आरोग्य संवर्धन, रोगप्रतिबंध, आरोग्य शिक्षण आणि लोकसहभाग या बाबींनाही समान महत्त्व देणे आवश्यक आहे. प्राथमिक आरोग्य स्तरावर उपलब्ध असलेल्या साधनसुविधांचा प्रभावी वापर करून नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचे आवाहन त्यांनी प्रशिक्षणार्थींना केले.

प्राचार्य डॉ. शुमा राठोड यांनी आरोग्य क्षेत्रात सातत्याने बदल होत असल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांनी आपले ज्ञान आणि कौशल्ये अद्ययावत ठेवणे आवश्यक असल्याचे नमूद केले. प्रशिक्षणाच्या माध्यमातून मिळणाऱ्या ज्ञानाचा प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजात प्रभावी वापर झाल्यास त्याचा थेट लाभ नागरिकांना मिळू शकतो, असे त्यांनी सांगितले.

प्रशिक्षण केवळ सैद्धांतिक माहितीपुरते मर्यादित न ठेवता प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान, कौशल्ये आणि कार्यपद्धती प्रत्यक्ष आरोग्य सेवा देताना वापरणे आवश्यक आहे. नागरिकांना अधिक दर्जेदार, सुलभ आणि लोकाभिमुख आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशिक्षणार्थींनी सक्रियपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

राज्यस्तरीय मार्गदर्शकांनी प्रशिक्षणार्थींशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या क्षेत्रीय कामकाजातील अनुभव, अडचणी तसेच प्राथमिक आरोग्य सेवा देताना येणाऱ्या विविध बाबी जाणून घेतल्या. प्रशिक्षणार्थींनीही आपल्या कार्यक्षेत्रातील अनुभव व सेवा देताना येणाऱ्या अडचणी याबाबत माहिती दिली.

या संवादादरम्यान उझकउ संकल्पनेची क्षेत्रीय स्तरावर प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल, प्राथमिक आरोग्य सेवांची गुणवत्ता कशी वाढविता येईल तसेच नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून आरोग्य सेवा देताना कोणत्या बाबींची दक्षता घ्यावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

राज्यस्तरीय मार्गदर्शकांच्या प्रत्यक्ष भेटीमुळे प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांची अधिक स्पष्टता मिळाली असून, प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा आपल्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे वापर करण्यासाठी आवश्यक दिशा मिळाली.

# काठोकाठ भरलेली शेततळी, जलतारा अन् फुललेल्या बागा; पिंपळगाव घाडग्यात जलसमृद्धीने बदलली शेतीची दिशा!

## सीएसआर फंडातून बायफने केलेले काम बघून महिंद्रा कंपनीचे पथक प्रभावित!

**इगतपुरी (समर्थ गांवकरी)**

शेतीचा इतिहास आणि भूगोल बदलवत शिवार पाणीदार करणारी काठोकाठ भरलेली शेततळी, उन्हाळ्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलसमृद्धी प्रकल्पांतर्गत दुरुस्त केलेल्या सामुदायिक विहिरी आणि त्यावर बसवलेले सोलर पॅनल, भूजल पुनर्भरण व भूजल पातळी वाढवणारे जलतारा आणि रिचार्ज शाफ्ट, उपलब्ध पाण्याचा जपून वापर करत पिकांसाठी योग्य खत नियोजनाला हातभार लावणारी ठिबक सिंचन योजना, पडीक जमिनीवर बहरलेल्या आंब्याच्या बागा, शेतशिवारातील डोलणाऱ्या आंब्याच्या बागांमध्ये जोमाने घेतलेले आंतरपीक आणि फुललेली भाजीपाल्याची शेती आदिवासी भागातील डोंगरदऱ्यांमधील शेतकऱ्यांच्या आयुष्यात परिवर्तन घडवणाऱ्या या उपक्रमांची खास पाहणी करण्यासाठी आलेल्या महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीच्या अधिकाऱ्यांचे पथक या कामांनी अत्यंत प्रभावित झाले. ग्रामस्थांशी संवाद साधत अधिकाऱ्यांनी या उपक्रमांचा प्रत्यक्ष उपयोगही जाणून घेतला. कंपनीच्या सीएसआर फंडातून झालेल्या या समाजोपयोगी कामांबद्दल त्यांनी समाधान आणि आनंद व्यक्त केला.

ढोल-ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांनी सादर केलेले लेझीम नृत्य, स्थानिक आदिवासी ग्रामस्थांनी पारंपरिक वेशभूषेत लोकनृत्य सादर करत केलेल्या उत्स्फूर्त स्वागताने पाहुणेही भारावून गेले... निमित्त होते पिंपळगाव घाडगा गावात आयोजित सीएसआर महोत्सवाचे!

महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे इगतपुरी येथील प्लांट हेड भरत भोये आणि कंपनीचे अधिकारी तसेच कर्मचारी सीएसआर निधीतून झालेल्या कामांची पाहणी करण्यासाठी आले होते. त्यांनी पिंपळगाव घाडगा गाव परिसरात प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

जलसंधारणासोबत आधुनिक शेतीला चालना देणारी शेततळी, सामुदायिक विहिरींची दुरुस्ती, जलतारा, रिचार्ज शाफ्ट, ठिबक सिंचन सुविधा, आंबा फळबाग प्रात्यक्षिक आणि भाजीपाला शेती या उपक्रमांची त्यांनी पाहणी केली. ग्रामस्थांशी संवाद साधून या कामांचा प्रत्यक्ष उपयोगही जाणून घेतला. महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीच्या यासाठी सीएसआर फंडातून ही कामे झाली आहेत.

बायफ लाइवलीहूड्सचे वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक सुरेश सहाणे आणि सहाय्यक कार्यक्रम व्यवस्थापक प्रशांत बोराडे यांनी प्रकल्पातील कामांची तपशीलवार माहिती दिली. ग्रामस्थांचे श्रमदान आणि लोकसहभाग हे या प्रकल्पाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी सांगितले. पिंपळगाव घाडग्याचे सरपंच देविदास देवगिरे, गुलाब जाधव, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांनीही प्रकल्पामुळे झालेले बदल, अनुभव आणि उपयुक्तता अधिकाऱ्यांना सांगितले. विविध प्रश्न विचारत भरत भोये यांनी कामांची बारकाईने माहिती घेतली.



मागील वर्षी सप्टेंबरमध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाची उभारणी स्थानिक गरजा लक्षात घेऊन करण्यात आली आहे.

हंगामी स्थलांतर कमी करणे, गावातच शेतीवर आधारित रोजगार उपलब्ध करून देणे, उन्हाळ्यातील पाणीटंचाई दूर करणे आणि दुबार पीक घेणे, हा प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. पहिल्या वर्षात १७ शेततळी बांधण्यात आली असून, त्याचा लाभ ३४ शेतकऱ्यांना झाला आहे. या माध्यमातून सुमारे २३८ लाख लिटर पाणीसाठा निर्माण झाला असून ३० एकर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. त्यामुळे शेतीचे नियोजन अधिक प्रभावी झाले असून उत्पन्नवाढीस मदत झाली आहे. भाजीपाला पिके आणि दुबार पीक घेणेही शक्य झाले आहे. यावर्षीच्या कामाचे जलपूजन झाले आहे. यावर्षी ५ शेततळी, ४ विहीर दुरुस्ती, भूजल पुनर्भरणासाठी २१ जलतारा संरचना ही कामे पूर्ण होणार आहेत. ३० शेतकऱ्यांना ठिबक सिंचन संच वाटप करण्यात आले आहेत.

# आदिवासी विकास विभागाने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गदा, याबाबत मंत्री झिरवळ यांना निवेदन

**शिवनेरी (समर्थ गांवकरी)**

आदिवासी विकास विभाग दि. ५ ऑगस्ट २६ व दि. १४ ऑगस्ट २६ रोजी शासकीय आदिवासी वस्तीगृहांसाठी जारी केलेल्या सुधारित नियमावलीतील अनेक त्रुटी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या अधिकारावर गदा आणणाऱ्या आहेत त्या तात्काळ रद्द व्हाव्यात यासाठी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया पुणे जिल्हा समिती अध्यक्ष संस्कृती गोडे व सचिव अक्षय घोडे यांनी मंत्री महोदय अन्न व औषध प्रशासन नरहारी झिरवळ यांना निवेदन किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी आदिवासी सभागृह येथे दि. २६ बुधवार रोजी दिले आहे .

या निवेदनात म्हटले आहे की , आदिवासी विद्यार्थी पालक व विद्यार्थी संघटनेच्या प्रतिनिधींना विचारात घेऊन दि. ११ / ११ / २०११ रोजी चा शासन निर्णय बदल मान्य करून महागाई निर्देशांकानुसार डीबीटी मध्ये वाढ करण्यात यावी .अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना वस्तीगृहात प्रवेश देण्यात यावा .

विद्यार्थ्यांना विमा संरक्षण तसेच थकीत शिष्यवृत्ती व डीबीटीच्या रकमा कोणताही विलंब न करता तात्काळ वितरित करावी. विद्यार्थिनींच्या आरोग्य तपासणीच्या नावाखाली मासिक पाळी नोंदवही यासारख्या गोपनीयतेचा भंग करणाऱ्या तरतुदी रद्द कराव्यात.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सर्व सुविधा , व्यायाम शाळा , दिव्यांगांसाठी व नियमित मोफत आरोग्य तपासणी उपलब्ध करून द्यावी. गडचिरोली येथील विद्यार्थ्यांना सर्पदोष होऊन झालेल्या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारून आदिवासी विकास मंत्री प्राध्यापक अशोक उईके यांनी राजीनामा द्यावा व पीडित कुटुंबाला एक कोटी नुकसान भरपाई देण्यात यावी.

विद्यार्थी दुखापत किंवा मृत्युमुखी पडल्यास असलेली स्नानगृह अनुदान योजना शासकीय वस्तीगृहासाठी लागू करण्यात यावी. आश्रम शाळेत पदभरती व आश्रम शाळा वस्तीगृहाच्या क्षमतेत तात्काळ वाढविण्यात यावी. अशा विविध मागण्यांचे निवेदन मंत्री महोदय नरहरी झिरवळ यांना स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया पुणे जिल्हा समितीने केले आहे.

# मंचर येथील तपनेश्वर सेवा मंडळाच्या वतीने देणगीदारांचा सन्मान

**मंचर (समर्थ गांवकरी)**



तपनेश्वर सेवा मंडळ, मंचर यांच्या वतीने तपनेश्वर मंदिर परिसरातील कमान गेट व दोन्ही बाजूंच्या लोखंडी जाळ्या (ग्रील) अर्पण करणाऱ्या देणगीदारांचा सन्मान करण्यात आला.भाविकांच्या सोयीसाठी तसेच मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी देणगीदारांनी दिलेल्या योगदानाबद्दल मंडळाच्या वतीने त्यांचे कौतुक करण्यात आले.

कमानमधील गेटसाठी दोन लाख ३० हजार रुपयांचे योगदान विलासशेठ बेंडे यांनी स्व.देऊबाई, स्व.हरिभाऊ बेंडे व स्व.कमल विलास बेंडे यांच्या स्मरणार्थ अर्पण केले.कमानीच्या एका बाजूची जाळी एक लाख ३५ हजार रुपयांची असून ती संजयशेठ कडधेकर व डॉ.प्रविण कडधेकर यांनी स्व.शंकूतला व ह.भ.प.शशिकांत विठ्ठल कडधेकर यांच्या स्मरणार्थ अर्पण केली.दुसऱ्या बाजूची एक लाख ३५ हजार रुपयांची जाळी नारायण प्रभू निघोट व शिंदे यांनी स्व.पार्बताबाई प्रभू निघोट व स्व.माधुरी नारायण निघोट यांच्या स्मरणार्थ अर्पण केली.या योगदानाबद्दल तपनेश्वर सेवा मंडळाच्या वतीने देणगीदारांचा सत्कार करण्यात आला.यावेळी रखमाजी थोरात (पोस्टमन) यांचाही मंडळाच्या वतीने सन्मान करण्यात आला.यावेळी उद्योजक दादाभाऊ थोरात,संतोष बाणखेले,शामराव निघोट,माजी सरपंच जालिंदर बिबवे, कैलास गांजाळे,दत्तात्रय मोरडे, राजाराम निघोट,संजय चिंचपूरे,गजानन राजगुरू इत्यादी मान्यवर उपस्थित होते.मंदिर परिसराच्या विकासासाठी भाविक व दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन तपनेश्वर सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले.

# बालघरातील चिमुकल्यांना हॉटेलमध्ये स्नेहभोजन; शैक्षणिक साहित्याचीही भेट

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

बालघरातील मुलांना त्यांच्या नेहमीच्या निवासाच्या वातावरणापेक्षा वेगळे ठिकाण पाहता यावे, त्यांना काही काळ आनंदाचे क्षण अनुभवता यावेत आणि इतर मुलांप्रमाणे हॉटेलमध्ये भोजनाचा अनुभव घेता यावा, या उद्देशाने कृष्णप्रित वेलफेअर फाऊंडेशन, कृष्णाली फाऊंडेशन आणि हॉटेल शिंदेशाही यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

पाइपलाइन रोडवरील हॉटेल शिंदेशाही येथे बालघरातील मुलांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुलांना शालेय साहित्याचेही वाटप करण्यात आले. मुलांना केवळ आवश्यक वस्तू देण्याऐवजी त्यांच्या रोजच्या वातावरणातून काही काळ बाहेर आणून त्यांना नवीन ठिकाणाचा अनुभव मिळावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये बालघरात जाऊन मुलांना साहित्य किंवा अन्य मदत दिली जाते. मात्र, या उपक्रमात मुलांनाच बालघरातून बाहेर आणून हॉटेलमध्ये भोजनाची व्यवस्था करण्यात आली. हॉटेलमध्ये प्रवेश केल्यापासूनच मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. वेगळे ठिकाण पाहण्याची उत्सुकता आणि एकत्र भोजन करण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

मुलांसोबत एकत्र भोजन करताना त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. त्यांच्या आवडी-निवडी जाणून घेण्यात आल्या तसेच त्यांच्यासोबत काही काळ आपुलकीने वेळ घालविण्यात आला. मुलांना वस्तूंची मदत देण्यासोबतच त्यांना वेळ, आपुलकी आणि आनंदाचे क्षण देणेही महत्त्वाचे आहे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.



स्नेहभोजनासोबत मुलांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला हातभार लागावा, या उद्देशाने ही मदत देण्यात आली. साहित्य मिळाल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद उपस्थितांसाठी समाधानाचा क्षण ठरला.

बालघर प्रकल्पाचे संचालक युवराज गुंड यांनी या उपक्रमाबद्दल कृष्णप्रित वेलफेअर फाऊंडेशन, कृष्णाली फाऊंडेशन, हॉटेल शिंदेशाही तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व उद्योजक, मान्यवर आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. मुलांना त्यांच्या नेहमीच्या वातावरणापेक्षा वेगळ्या ठिकाणी नेऊन नवीन अनुभव देण्याची ही संकल्पना संवेदनशील आणि कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

# ढोकेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ

## विद्यार्थ्यांनी घरातील सदस्यांसमोर व्यसन सोडण्यासाठी जिद्द करावी : उज्वला दीदी

**टाकळी ढोकेश्वर (समर्थ गांवकरी)**

समाजातील वाढते व्यसनाधीनतेचे प्रमाण लक्षात घेतले तर समाजातील सर्व घटकांनी व्यसनमुक्तीसाठी सामूहिक प्रयत्न करावेत आणि विद्यार्थांनी पालकांसमोर मोबाईल घेऊन देण्यासाठी हट्ट करण्याऐवजी घरातील सदस्यांना जडलेले व्यसन सोडवण्यासाठी हट्ट करावा असे प्रतिपादन प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय टाकळी ढोकेश्वर च्या उज्वला दीदींनी केले.

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पाचवी ते बारावीच्या १४०० शाळकरी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा घेतली व व्यसनापासून दूर राहण्याचा संकल्प केला त्या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उज्वला दीदी बोलत होत्या.

या प्रसंगी पायमोडे दीदी, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमोद भाई, रमण भाई, दिपक भाई, सुगंधा माताजी, बाबासाहेब जाधव, रवींद्र मते, श्रीरंग धामणे, संदीप महांडुळे, नारायण शेळके, निलम खिलारी, वैशाली गायखे, कल्पना जाधव, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे,सुरेखा ठाणगे, सोनल रोहकले, संदीप खिलारी, मिनाक्षी पवार, विष्णू भद्रे, सोनाली माळवदे, प्रा.अशोक गांगड, योगेश मांडगे, आतिष झावरे, देविदास आठरे, राजेंद्र ढोणे, सचिन महानवर,



पोपट जगदाळे, भाऊसाहेब हिंगडे, सुनील झावरे, मिनाक्षी खाडे, प्रा.दळवी, नितीन ढोकळे, मंगेश पोपळघट, रामदास नरवडे, सिमा खोसे,सोनल पायमोडे, अनिकेत बांगर, सुवर्णा दिघे, शिरीष राऊत, पवन कुटे, अनुष्का कांबळे, भाऊसाहेब बांबेरे, अमोल गोरे, नारायण हरेल, सुनिता घोडके इत्यादी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले तर आभार पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी मानले.

**सत्यनिकेतन संस्था राजूर, ता.अकोले, जि.अहिल्यानगर पिन ४२२ ६०४**

**थेट मुलाखती (Walk-In-Interview)**

आमच्या संस्थेच्या ॲड. मनोहरराव नानासाहेब देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राजूर ता. अकोले, जि. अहिल्यानगर या महाविद्यालयात शै. वर्ष २०२६-२०२७ करिता अनुदानित (CHB) तासिका तत्त्वावरील पदवी विषयांसाठी **सहायक प्राध्यापक** पदाकरिता खालील प्रमाणे जागा भरावयाच्या आहेत.

| पदवी स्तर | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | विषय | पद संख्या | सामाजिक आरक्षण |
| १ | इंग्रजी | २ (तासिका) | Open to All |
| २ | गणित | २ (तासिका) | |

**(वरील पदांच्या थेट मुलाखती सोमवार दि. ०७/०९/२०२६ रोजी सकाळी १० वा. होतील.)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महाराष्ट्र शासन व विद्यापीठ अनुदान आयोग यांचे नियमानुसार शै. पात्रता असलेल्या पात्रताधारक उमेदवारांनी आपला अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह मुलाखत दिनांक पुर्वी mndcollegerajur@gmail.com या मेलवर पाठविणे अनिवार्य आहे. तसेच स्वखर्चाने मुलाखतीसाठी महाविद्यालयात उपस्थित राहावे. अनुभवी उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. पात्रताधारक राखीव उमेदवार न मिळाल्यास इतर प्रवर्गातील उमेदवार नियुक्त करण्याचा अधिकार निवड समितीस राहिल. तसेच उपलब्ध कार्यभारावर पद अवलंबुन राहिल.

**प्रो. डॉ. बी. वाय. देशमुख (प्राचार्य)** **श्री. एम. एल. मुठे (सचिव)** **ॲड. एम. एन. देशमुख (अध्यक्ष)**

# मा. मंत्री बाळासाहेब थोरात हे कायम जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध

■ जनसेवेच्या कामात कायम असल्याने नागरिकांची दररोज मोठी गर्दी

■ एक तालुका एक परिवार ही संकल्पना संगमनेर तालुक्यात आजही कायम



संगमनेर (समर्थ गांवकरी)

कधीकाळी दुष्काळी असलेला संगमनेर तालुका हा लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सततच्या विकास कामांमधून प्रगतशील बनवला. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी ते कायम कटिबद्ध आहेत.

तालुक्यातील प्रत्येक गावांमधील नागरिकांची दररोज मोठी गर्दीकायम असून एक तालुका एक परिवार ही संकल्पना संगमनेर तालुक्यात जात असून नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात हे कायम जनतेमध्ये आहेत.

मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आपल्या कामातून सर्वसामान्य जनतेच्या हृदयामध्ये स्थान निर्माण केले आहे. संगमनेर तालुका हा त्यांनी परिवार मानला असून मागील ४० वर्षात एकही दिवस विश्रांती न घेता जनतेसाठी काम केले आहे.

सत्तेत असो वा नसो त्यांचा शब्द हा प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांवर प्रमाण असून सर्वसामान्य नागरिकांसाठी ते कायम आधारवड राहिले आहे. महसूल मंत्री कृषी मंत्री शिक्षण मंत्री अशी महत्त्वाची खाती त्यांनी भूषवली असून सध्या काँग्रेसच्या अत्यंत महत्त्वाच्या वर्किंग कमिटीचे ते सदस्य आहेत किंबहुना देशभरातील महत्त्वाच्या २१ नेत्यांमध्ये त्यांचा समावेश आहे. सध्याचे राज्यातील सत्ताधारी किंवा प्रशासनातील अधिकारी सुद्धा त्यांचा शब्द कधी टाळत नाही.

शांत संयमी सर्वांना समजून घेणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व असून सर्वसामान्य जनतेसाठी लोकनेते बाळासाहेब थोरात हे कायम अशा स्थान राहिले आहे त्यामुळे विविध सामाजिक व्यक्तिगत प्रश्न सोडवण्यासाठी नागरिकांची त्यांच्याकडे कायम मोठी गर्दी असते.

संगमनेर तालुक्यातील सहकार शिक्षण संस्था ग्रामीण विकास विविध वैभवशाली इमारती पायाभूत सुविधा याचबरोबर उत्तर अहिल्यानगर जिल्ह्याला वरदान ठरणारे निळवंडे धरण दोन्ही कालवे ही ऐतिहासिक कामे त्यांनी मार्गी लावली आहेत याचबरोबर संगमनेर मध्ये शांतता व सुव्यवस्था राखून संगमनेरला राज्यात अग्रगण्य बनवले आहे.

यशोधन जनसंपर्क कार्यालय हे तालुक्यातील व राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी कायम खुले असून या माध्यमातून शासनाच्या योजना व्यक्तिगत कामे यांसाठी पाठपुरावा केला जातो.

लोकनेते बाळासाहेब थोरात सुदर्शन निवासस्थान यशोधन कार्यालय कारखाना नवीन प्रशासकीय इमारत या ठिकाणी नागरिकांना भेटीसाठी उपलब्ध असतात तर दररोज तालुक्यातील विविध कार्यक्रम, अनेक नागरिकांच्या नवीन व्यवसायांची उद्घाटणे, विविध विकास कामे, सहकारी संस्था याचबरोबर राज्यातील अनेक मोठमोठ्या कार्यक्रमांसाठी त्यांची उपस्थिती महत्त्वाची ठरत आहे.

> संगमनेर प्रामाणिकपणा ही ओळख लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्यामुळे
> राज्यभरात कुठेही गेले तरी संगमनेर कर म्हटले की आम्हाला मोठा सन्मान मिळतो. तुम्ही थोरात साहेबांच्या तालुक्यातील म्हणून मानसन्मान दिला जातो. प्रामाणिक माणूस म्हणून गौरव केला जातो ही सर्व ओळख लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केलेल्या कामातून मिळत असून त्यांच्यामुळे तालुक्यातील प्रत्येक नागरिकाला राज्यभरात सन्मान मिळत आहे
>
> **–इंजिनीयर इंद्रभान चौधरी, कनोली**

प्रत्येकाचा प्रश्न समजून घेणे, त्याला समजावून सांगा त्याचा प्रश्न मार्गी लावणे ही त्यांची हातोटी असून थेट भेट आणि सर्वांना समजून घेणारा नेता अशी त्यांची ओळख आहे. त्यामुळे तालुका जिल्हा व राज्यभरातून नागरिक महिला युवक मोठ्या संख्येने आपले प्रश्न घेऊन येत असून सर्वांचे समाधान लोकनेते बाळासाहेब थोरात हे त्यांच्या पातळीवर करत आहेत.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### तांबडेमळा उपसरपंचपदी सुदर्शन भोर यांची बिनविरोध निवड



मंचर (समर्थ गांवकरी)

आंबेगाव तालुक्यातील तांबडेमळा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सुदर्शन मारुती भोर यांची निवड करण्यात आली आहे.राजू तांबडे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंचपदासाठी सरपंच प्राजक्ता तांबडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

सुदर्शन मारुती भोर यांचाच उपसरपंचपदासाठी अर्ज प्राप्त झाल्याने सुदर्शन भोर हे बिनविरोध निवडून आले.या वेळी ग्रामविकास अधिकारी विशाल ढसाळ यांनी निवडणूक अधिकारी म्हणून कामकाज पाहिले.उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल राजू तांबडे, मच्छिंद्र तांबडे, विजय तांबडे, सुनंदा तांबडे, प्रतिभा भोर, मेघा भोर यांनी सुदर्शन भोर यांचे अभिनंदन केले.

### बीजमाता राहीबाई पोपेरे यांनी गावरान बियाणांपासून बनविल्या राख्या.....



राजूर(समर्थ गांवकरी)

सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती ओवाळीते भाऊ राया रे वेड्या बहिणीची रे वेडी माया ! या मराठी गीतातील सुंदर ओळींमधून बहीण भावाच्या नात्याची आपुलकी आणि माया आपल्या डोळ्यासमोर उभी राहते .अगदी या गीताला शोभेल असेच तालुक्यातील पद्मश्री राहीबाई सोमा पोपेरे यांनी आपल्या भावासाठी म्हणजेच चंद्रकांत दादा पाटील यांच्यासाठी बीज राखी बनवून एक अनोखी व जगावेगळी भेट आपल्या भावाला दिलेली आहे. भात , नागली, वरई, काकडी, भोपळा , तूर ,मूग , उडीद , वाल , काकडी , घोसाळी , डांगर भोपळा यासारख्या अनेक प्रकारच्या गावरान बियांचा वापर करून त्यांनी या राख्या स्वतःच्या हाताने बनवलेल्या आहेत. चंद्रकांत दादा पाटील यांना बंधू मानलेल्या पद्मश्री राहीबाई यांनी आजपर्यंत बीज बँकेच्या रूपाने महाराष्ट्रातील हजारो शेतकऱ्यांना आपल्या विशेष प्रेमाने व गावरान बीज संवर्धन व पुरवठा करून आदराने आपले भाऊ बनवून घेतले आहे. राहीबाई यांच्या वात्सल्य आणि प्रेमापोटी हजारो शेतकरी त्यांना आपली बहीण मानतात. या शेतकऱ्यांच्या प्रेमापोटी व त्यांचा मनस्वी आदर राखण्यासाठी त्यांनी या बीज राख्यांची निर्मिती केली आहे.चंद्रकांत दादा पाटील राहीबाई यांना आपल्या भगिनी मानतात व राहीबाई सुद्धा त्यांना तेवढेच आदराचे स्थान देतात हे सर्वश्रुत आहे. आपल्या या प्रेमळ भावासाठी त्यांनी बीज राख्यांची विशेष मोहीम राबवली आहे. त्याचप्रमाणे देशाच्या सीमेवर लढणाऱ्या सैनिकांच्या प्रती प्रेम आणि आदर भावना मनामध्ये ठेवून एक धागा राष्ट्रबांधणीचा या विचारांना पुढे नेण्यासाठी त्यांनी या राख्या बनवल्याचे सांगितले आहे.

### पेमराज सारडा महाविद्यालयाच्या कृष्णा गायकेची रेड रन मॅरेथॉन स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रेड रन मॅरेथॉन स्पर्धेत पेमराज सारडा महाविद्यालयाचा खेळाडू कृष्णा गायके याने प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले.या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याची राज्यस्तरीय रेड रन मॅरेथॉन स्पर्धेसाठी निवड झाली. कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय रेड रन मॅरेथॉन स्पर्धेत कृष्णा गायके याने उत्कृष्ट कामगिरी करत चौथा क्रमांक मिळविला. राज्यस्तरीय स्पर्धेतील त्याच्या कामगिरीबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्याला दहा हजार रुपये रोख पारितोषिक, मेडल व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ड.अनंत फडणीस,मानद सचिव संजय जोशी,कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे, प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक डॉ.सुजित कुमावत,प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी कृष्णा गायकेच्या यशाचे कौतुक केले.

# एनसीसीमधून चांगला नागरिक घडतो : कर्नल प्रदीपकुमार बेहरा

**संरक्षण क्षेत्रात अधिकारी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास व कठोर मेहनत करावी : कर्नल प्रदीपकुमार बेहरा (सी ओ १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अहिल्यानगर)**

जामखेड (समर्थ गांवकरी)

दि राष्ट्रीय छात्र सेना (आर्मी) १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अहिल्यानगरचे नूतन कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रदीपकुमार बेहरा (३/४ जी आर रेजिमेंट) यांनी दि २५ ऑगस्ट २०२६ रोजी जामखेड विभागातील विविध एनसीसी युनिटला सदिच्छा भेट देऊन कॅडेट्स तसेच विद्यार्थ्यांना व असोसिएट एनसीसी अधिकारी यांना मार्गदर्शन केले.

कर्नल बेहरा यांनी जामखेड महाविद्यालय, जामखेड, ल. ना. होशिंग विद्यालय तसेच रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश विद्यालय, जामखेड येथील एनसीसी युनिटला भेट दिली. त्यांच्या भेटीदरम्यान जामखेड महाविद्यालयातील एनसीसी सीनियर डिव्हिजन भरती प्रक्रियेची पाहणी करून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर ल. ना. होशिंग विद्यालयाला भेट देऊन शेवटी श्री नागेश विद्यालयातील एनसीसी युनिटची पाहणी केली.



तसेच कर्नल बेहरा यांनी प्राचार्य कॅप्टन डॉ गौतम केळकर, प्राचार्य बाळासाहेब पारखे, प्राचार्य बी के मडके उप मुख्याध्यापक अनिल देड,सेकंड ऑफिसर मयूर भोसले यांचा एनसीसी ट्रॉफी व भेटवस्तू देऊन सन्मान केला.

यावेळी मार्गदर्शन करताना कर्नल प्रदीपकुमार बेहरा म्हणाले, विद्यार्थ्यांना शिस्त, नेतृत्वगुण, देशप्रेम आणि जबाबदारीची जाणीव देऊन एक चांगला नागरिक घडविणे हे एनसीसीचे प्रमुख ध्येय आहे. विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत, जिद्द आणि चिकाटी आत्मसात करून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी कार्य करावे.

तसेच संरक्षण क्षेत्रात अधिकारी म्हणून करिअर करण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आतापासूनच अभ्यासात सातत्य ठेवून कठोर परिश्रम करावेत. शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक क्षमता, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच एनसीसी अधिकारी व विद्यालयाला मार्गदर्शन केले.

# मागण्या मान्य होईपर्यंत माघार नाही; घोडेगावातील बेमुदत धरणे आंदोलन सुरूच



मंचर (समर्थ गांवकरी)

घोडेगाव आदिवासी प्रकल्प अंतर्गत वसतिगृह व आश्रमशाळांमधील विविध प्रश्न तातडीने सोडवावेत,या मागणीसाठी पुणे जिल्हा समितीच्या वतीने घोडेगाव येथे सुरू असलेल्या बेमुदत धरणे आंदोलनाचा बुधवार दि.२६ रोजी दुसरा दिवस होता.मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

आंदोलनस्थळी प्रकल्प अधिकारी गणेश इवनाते उपस्थित झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी चर्चा केली.यावेळी वसतिगृहातील मूलभूत सुविधा, विद्यार्थ्यांची सुरक्षितता, दर्जेदार आहार व शैक्षणिक साहित्य, आदिवासी नोकरभरती, पेसा कायद्याची अंमलबजावणी तसेच मंचर वसतिगृहातील पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनची दुरुस्ती आदी प्रश्न मांडण्यात आले.मात्र चर्चेनंतरही मागण्यांच्या अंमलबजावणीबाबत ठोस निर्णय झाला नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी कायम आहे.मंचर व घोडेगाव येथील मुलांच्या वसतिगृहासाठी केवळ खेळाचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असून, अन्य मागण्यांवर अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही.

# जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानच्या शोभायात्रेने नगर शहर दुमदुमले

**फुलांनी सजवलेल्या रथात भगवान जिव्हेश्वरांची मूर्ती; हिंदवी शौर्य ढोल पथक ठरले आकर्षण**

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



स्वकुळसाळी समाजाचे आराध्य दैवत भगवान श्री जिव्हेश्वर यांच्या जन्मोत्सवानिमित्त जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने अहिल्यानगर शहरातून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

या मिरवणुकीत अग्रभागी आकर्षक फुलांची सजावट केलेल्या रथामध्ये भगवान श्री जिव्हेश्वर यांची सुंदर व आकर्षक मूर्ती ठेवण्यात आली होती. या शोभायात्रेचे मुख्य आकर्षण हिंदवी शौर्य पारंपरिक ढोल पथक हे ठरले. या ढोल पथकामध्ये ढोल–ताशा वाजविणारी मुले–मुली,तसेच शंखनाद व भगवे ध्वज हे या मिरवणुकीचे वैशिष्ट्य ठरले. ढोल पथकाच्या तालबद्ध आवाजाने संपूर्ण नगर शहर दुमदुमून गेले.मिरवणुकीचा मार्ग बागड पट्टी येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिर येथून प्रारंभ,नेता सुभाष चौक,चितळे रोड,चौपाटी कारंजा,दिल्लीगेट,तोफखाना नवरंग व्यायाम शाळा, शितळादेवी,बागडपट्टी येथे मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. या मिरवणुकीत मान्यवरांची उपस्थिती महापौर ज्योतीताई गाडे, माजी उपमहापौर दिपक सुळ, माजी महापौर भगवानराव फुलसौंदर,संतोष गेनाप्पा,पै.श्रीकांत छिंदम यांनी शोभायात्रेत आदी मान्यवर उपस्थित होते.

# सचिन वाकचौरे हत्याकांडातील मुख्य सूत्रधाराला अटक करण्यासाठी पिंपळगाव निपाणी ग्रामस्थांचे आमरण उपोषण!

गणोरे (समर्थ गांवकरी)



अकोले तालुक्यातील आढाळा परिसरातील धांबोडी फाटा येथे २६ जुलै २०२६ रोजी सचिन किसन वाकचौरे (वय ३६) यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या हत्याकांडातील मुख्य सूत्रधाराचा शोध घेऊन त्याला अटक करावी तसेच आढाळा परिसरातील अवैध धंदे तातडीने बंद करावेत, या प्रमुख मागण्यांसाठी पिंपळगाव निपाणी येथील ग्रामस्थांनी ग्राम पंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

या हत्याकांडातील चार आरोपींना पोलिसांनी अटक केली असली तरी मुख्य सूत्रधार अद्याप मोकाट असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सचिन वाकचौरे यांचा मृतदेह हात–पाय बांधलेल्या व नग्न अवस्थेत पिंपळगाव खांड येथील धरणात टाकण्यात आला होता. पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे.

# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेस आयएसओ (ISO) मानांकन प्राप्त

संगमनेर (समर्थ गांवकरी)

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लिमिटेड या बँकेच्या कॉर्पोरेट ट्रेनिंग हॉलचे उद्घाटन मा.मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या शुभहस्ते पार पडले. याच कार्यक्रमांमध्ये नुकतेच बँकेला मिळालेल्या आयएसओ मानांकन बद्दल प्राप्त झालेल्या सर्टिफिकेट चे हस्तांतरण बँकेस करण्यात आले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लिमिटेड या बँकेला आयएसओ ९००१:२०१५ मानांकन प्राप्त झाल्या प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेने गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून, बँकेला आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयएसओ ९००१:२०१५ (ISO 9001:2015) हे मानांकन प्राप्त झाले आहे. हे मानांकन बँकेच्या ग्राहक सेवा, कार्यपद्धती आणि अंतर्गत नियंत्रण प्रणालीच्या उच्च दर्जाचे निदर्शक आहे. आयएसओ ९००१:२०१५ हे आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली (टींरश्र्ळीू चरपरसशाशपीं ड्रींशा) मानक आहे. हे मानांकन मिळाल्यामुळे हे अधोरेखित होते की संस्था, ग्राहकाभिमुख सेवा आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता, कार्यपद्धतींचे प्रमाणीकरण व एकसूत्रीकरण अंतर्गत नियंत्रण व जोखीम व्यवस्थापनातील सुधारणा,सातत्यपूर्ण सुधारणा साठी बांधिलकी, नियामक आणि भागधारकांचा वाढता विश्वास साध्य करताना दिसत आहे.

बँकेचे अध्यक्ष सुधाकर जोशी यांनी समाधान व्यक्त करताना सांगितले की, हे मानांकन बँकेच्या संचालक मंडळ, व्यवस्थापन आणि सर्व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे. गुणवत्तापूर्ण सेवा देण्याच्या दिशेने बँकेने उचललेले हे पाऊल ठेवीदार, सभासद आणि ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करेल, तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (RBI) सुशासन (Governance) व अंतर्गत नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत कार्यपद्धती राबविण्यासाठी बँक कटिबद्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले. हे मानांकन प्राप्त झाल्यानंतर बँक आपल्या कार्यपद्धती, ग्राहक सेवा आणि तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर देणार आहे. सदर मानांकनाच्या अनुषंगाने वार्षिक अंतर्गत लेखापरीक्षण (Internal udit) आणि पुनर्मूल्यांकन (डींीशळश्रश्ररपलश 'विळीं) नियमितपणे केले जाईल, जेणेकरून गुणवत्तेचा हा दर्जा कायम राखता येईल.

सध्या बँकिंग व्यवस्था ही पूर्णपणे रिझर्व्ह बँकेच्या मापदंडाप्रमाणे कार्यरत आहेत आणि आपली बँक देखील याचे तंतोतंत पालन करत आहे. बँकेने व्यवसायामध्ये प्रगती साधताना गुणवत्ता देखील राखली असल्याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. बँकेने कार्पोरेट ट्रेनिंग हॉल तयार करून आणि आपल्या कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या विषयांवर प्रशिक्षण देण्याचा चांगला उपक्रम हाती घेतला आहे. बँक विविध क्षेत्रांमध्ये करत असलेल्या सुधारणांबद्दल उपस्थितितांना



अवगत केले. बँक डिजिटलायझेशन धोरण स्वीकारून, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर विविध विभागांमध्ये करताना ग्राहकांना जागतिक दर्जाच्या सुविधा या ग्रामीण भागांमध्ये उपलब्ध करून देत आहे. याबद्दल अधिक माहिती देताना या सेवांमुळे बँकेची होत असलेली प्रगती बद्दल उपस्थितांना माहिती दिली.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुजराथी यांनी नुकत्याच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया तर्फे काढलेल्या परिपत्रकांचे बँक व्यवस्थापनाने अभ्यास करून त्याबाबतीत बँकेला धोरणांशी सुसंगत ठेवण्याचे काम केले असल्याचे सांगितले. नव्याने येणाऱ्या डीपीडीपी ॲक्ट २०२३ या कायद्याबद्दल उपस्थितांना माहिती दिली. याच कार्यक्रमांमध्ये बँकेला आयएसओ मानांकन मिळवून देताना गेले कित्येक महिने याचे नेतृत्व करणाऱ्या अमोल घुले आणि विवेक सोनवणे या कर्मचाऱ्यांचा सत्कार लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बँकेचे सर्व संचालक मंडळ, अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी,तसेच बँकेचे ग्राहक आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### घोडेगावात दोन घरांमध्ये घरफोडी; ३५ हजारांची रोकड लंपास



मंचर (समर्थ गांवकरी)

घोडेगाव ता.आंबेगाव येथील यशिका कॉम्प्लेक्समधील दोन घरांचे कडी–कोयंडे व कुलपे तोडून अज्ञात चोरट्याने घरातील कपाटे उचकटून तब्बल ३५ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी यमुना विनायक पानसरे (वय ६९, रा.प्लॅट क्रमांक १०१, यशिका कॉम्प्लेक्स, घोडेगाव) यांनी घोडेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ ऑगस्ट सकाळी दहा वाजल्यापासून २६ ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजण्याच्या दरम्यान ही घरफोडी झाली. अज्ञात चोरट्याने पानसरे यांच्या प्लॅटच्या दरवाजाचा कडी–कोयंडा कशाच्या तरी सहाय्याने उचकटून घरात प्रवेश केला.त्यानंतर कपाटाचे कुलूप व लॉकर उचकटून त्यातील २० हजार रुपयांची रोकड चोरून नेली. तसेच घोडेगाव येथील मंगेश बाळू वरे यांच्या घराचेही कडी–कोयंडे व कुलपे तोडून चोरट्याने घरात प्रवेश केला.कपाट उचकटून त्यातील १५ हजार रुपयांची रोकड लंपास केली. अशा प्रकारे दोन्ही घरांतून एकूण ३५ हजार रुपयांची रोकड चोरीस गेली आहे. येथे उपलब्ध असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरात चोरटे कैद झाले आहे.याप्रकरणी घोडेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अज्ञात चोरट्याचा शोध सुरू आहे.पोलिस उपनिरीक्षक हरिभाऊ नलावडे पुढील तपास करीत आहेत.

**दोन्ही घरांमध्ये झालेल्या घरफोडीचा तपास सुरु असून, घटनास्थळावरील पुरावे व उपलब्ध माहितीच्या आधारे चोरट्याचा शोध घेतला जात आहे. नागरिकांनी घर बंद ठेवताना सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि संशयास्पद हालचाली त्वरित पोलिसांना कळवाव्यात. सागर पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक घोडेगाव.**

### ब्राम्हणवाड्यात ईद मिलादुन्नबी उत्साहात साजरी!



ब्राम्हणवाडा (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावात ईद मिलादुन्नबी अर्थात पैगंबर जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त मदरशापासून मस्जिदपर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत लहान–मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.

मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणूक पार पडली.

मिरवणुकीनंतर मुस्लिम समाजाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमात सहभाग घेतला. आनंदी, उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात ईद मिलादुन्नबीचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

### पाचशेची नोट दाखवून महिलेचे ८० हजारांचे मंगळसूत्र लंपास

मंचर (समर्थ गांवकरी)

आंबेगाव तालुक्यातील एकलहरे गावच्या हद्दीत जुन्या पुणे–नाशिक महामार्गालगत पाहूण नावाच्या हॉटेलसमोरील पान टपरी जवळ दोन अनोळखी व्यक्तींनी महिलेची दिशाभूल करून पाचशेची नोट दाखवून सुमारे ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास केल्याची घटना मंगळवार दि.२५ रोजी घडली.याप्रकरणी मंचर पोलिस ठाण्यात दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सविता मच्छिंद्रनाथ सैद (वय ४८, धंदा–व्यवसाय) या एकलहरे गावच्या हद्दीत जुन्या पुणे–नाशिक महामार्गावरील एका हॉटेलसमोर असताना दोन अनोळखी व्यक्ती मोटारसायकलवरून तेथे आल्या.त्यापैकी मागे बसलेल्या व्यक्तीने सविता सैद यांच्याजवळ येऊन त्यांना गुप्त दान करण्यास सांगितले.त्यासाठी स्वतःकडील दीड हजार रुपयांपैकी पाचशे रुपयांची नोट मंगळसूत्राला लावून देण्यास सांगितले.अनोळखी व्यक्तीने खोटे बोलून विश्वास संपादन केल्यानंतर हातचलाखीने सैद यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र काढून घेतले. त्यानंतर दोन्ही संशयित मोटारसायकलवरून पसार झाले.चोरीस गेलेल्या मंगळसूत्राची किंमत सुमारे ८० हजार रुपये आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.पुढील तपास मंचर पोलिस करीत आहेत.

# कौशल्य, शिस्त आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर 'साई आदर्श' परिवाराची घोडदौड : महंत उद्धव महाराज मंडलिक

राहुरी (समर्थ गांवकरी)

संघटन कौशल्य हे कोणत्याही संस्थेच्या यशासाठी महत्त्वाचे असून अध्यात्मिक तसेच आर्थिक क्षेत्रात शिस्त पाळणे गरजेचे आहे. चांगले काम करणाऱ्याच्या पाठीमागे समाजातील सर्वजण ठामपणे उभे राहतात. याच धर्तीवर साई आदर्श परिवाराची सुरू असलेली यशस्वी वाटचाल कौतुकास्पद असून संस्थेची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहावी, असे गौरवोद्गार वरद विनायक सेवा धामचे ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक यांनी काढले.

राहुरी येथील साई आदर्श मल्टीस्टेटने २०० कोटी रुपयांच्या ठेवींचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केल्याबद्दल संस्थेच्या मुख्य कार्यालयात ठेवीदारांचा आभार व आनंद सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, ठेवीदार, संस्थेचे अधिकारी–कर्मचारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. तनपुरे कारखान्याचे चेअरमन अरुण तनपुरे म्हणाले की, १२ वर्षांच्या अथक मेहनतीच्या जोरावर साई आदर्शची घोडदौड आज २०० कोटी रुपयांच्या ठेवींपर्यंत येऊन पोहोचली आहे. संस्थेचे चेअरमन शिवाजी कपाळे यांच्या नेतृत्वाबरोबरच त्यांच्या परिवारातील सदस्य आणि सर्व कर्मचारी यांनी घेतलेली मेहनत मोलाची आहे. संस्थेने मिळवलेले हे यश कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी आमदार चंद्रशेखर कदम म्हणाले की, कर्तृत्वाच्या जोरावर मोठी झालेली माणसे नेहमीच मोठी होत असतात. साई आदर्शने विश्वास, पारदर्शकता आणि सातत्यपूर्ण कामाच्या जोरावर मोठी झेप घेतली आहे. संस्थेची अशीच अधिकाधिक प्रगती व्हावी आणि २०० कोटींच्या ठेवींचा टप्पा लवकरच ५०० कोटी रुपयांवर पोहोचावा, अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांनी संस्थेला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांचे स्वागत साई आदर्श पतसंस्थेच्या चेअरमन सौ.संगीता कपाळे यांनी केले. संस्थेचे चेअरमन शिवाजीराव कपाळे यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेत २०० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा गाठण्यामागील संस्थेचे धोरण, ठेवीदारांचा विश्वास आणि अधिकारी–कर्मचाऱ्यांचे योगदान याबाबत माहिती दिली.

यावेळी प्रेरणा उद्योग समूहाचे अध्यक्ष सुरेश वाबळे, शामराव निमसे, आबासाहेब वाळुंज, डॉ. तनपुरे कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर कोळसे, ज्ञानेश्वर पवार आदी उपस्थित होते.



प्रसंगी विष्णुपंत गीते, वेदांत कपाळे, दीपक त्रिभुवन, अविनाश साबरे, प्रकाश सोनी, किशोर कोबरणे, सुनील संचेती, योगप्रशिक्षक किशोर थोरात, प्रमिला गावडे, जगन्नाथ बोऱ्हाडे, अन्सार शेख, पारस नहार, इंद्रभान पेरणे, सुनील विश्वासराव, संदीप इरोळे, भाऊसाहेब गुंजाळ, ह.भ.प. नवले महाराज, साहेबराव आडभाई, किसन माने, अनिल वाघमारे, राजेंद्र कोबरणे, दीपक भावसार, पांडुरंग बोचकर, रवींद्र छाजेड, दादा माने, सोन्याबापू जाधव, मच्छीन्द्र टेकाळे, रमेश महेंद्रू, मधुकर देवकर, गांडुळे पुंजाराम, भास्कर आढाव, मच्छीन्द्र गुंजाळ, नानासाहेब वाघ, भास्कर कोळसे, विलास तमनर, गोविंद राऊत, दीपक गांधी, दत्तात्रय साळुंके, नाना वाळुंज, कचरू डुकरे, अनिल कांगणे, नितीन डमाळे, योगेश जाधव, संस्थेचे मुख्य व्यवस्थापक सचिन खडके व साई आदर्श परिवार उपस्थित होते.

# श्रीकृष्णाने आपले कर्तुत्व समाजाच्या मनावर बिंबवले, ज्येष्ठ कीर्तनकार महादेव महाराज राऊत

### लिंपणगाव येथील अखंड हरिनाम सप्ताहाचे काल्याच्या कीर्तनाने समारोप

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

बाळ श्रीकृष्णाने आपले कर्तृत हे समाजाच्या प्रत्येक घटकातील मनांवर बिंबवले, असे भावनिक प्रतिपादन जेष्ठ कीर्तनकार महादेव महाराज राऊत बीड यांनी आयोजित काल्याच्या कीर्तन सोहळा प्रसंगी व्यक्त केले.

लिंपणगाव तालुका श्रीगोंदा येथील जागृत देवस्थान श्री सिद्धेश्वर महाराज मंदिराच्या प्रांगणात ज्येष्ठ कीर्तनकार संजय महाराज गिरमकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेली आठ दिवस अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार व प्रवचन करांची कीर्तने व प्रवचने आयोजित करण्यात आली होती. श्रीकृष्ण हे पाच वर्षाचे असताना गोकुळात गवळणीमध्ये खेळत असताना त्यांच्या चारित्र्याविषयी वेगळा अर्थ काढला गेला. ते खोडताना महादेव महाराज राऊत यावेळी बोलताना म्हणाले की, कृष्ण हे देव अवतारी होते. महाराष्ट्रात कोणत्याही कीर्तनकारांनी या कृष्णाच्या फाईलला हात लावला नसेल, त्या फाईलला मी या किर्तनरुपी सेवेत हात लावत आहे. गोकुळामध्ये खेळत असताना कृष्णाच्या चरित्राला कलंक लावला जात आहे. परंतु कृष्ण हे स्वच्छ व पवित्र आहेत. गवळणी सोबत कृष्णाचे अनैतिक संबंध होते. हे म्हणणाऱ्याच्या जिभेला किडे का? पडत नाही. असा घनाघात महादेव महाराज राऊत यांनी केला. गोकुळामध्ये गवळणी सोबत खेळत असताना त्यांचे वय अवघे पाच वर्षाचे होते. त्यामुळे श्रीकृष्णावर जे काही बोलले जाते. ते योग्य नाही. गांभीर्याने प्रत्येकाने श्रीकृष्ण गाथा वाचावी म्हणजे ते कळेल. असे सांगून राऊत महाराज पुढे म्हणाले की, देव अवतारी या बाळावर संशय घेणे, हे कपोलकल्पित विधान असून, आपण त्याचा तीव्र निषेध करतो. असे महादेव महाराज यांनी श्रीकृष्णावर चारित्र्याहानन करणाऱ्यांवर घनाघात केला. पुढे बोलताना महादेव महाराज राऊत म्हणाले की, महाराष्ट्र हा संतांच्या पदस्पर्शाने पवित्र आहे. संतांचे विचार महाराष्ट्राने जोपासले पुढे चालू ठेवले आहे. त्यामुळे प्रत्येकाने भविष्यात संत महात्म्यांचे महाराष्ट्राच्या विचार व संस्कार अंगीकरण्ची नितांत गरज आहे. जर देवांवर असे वेगवेगळे अर्थ लावून समाजात कुणी तेढ निर्माण करत असेल, तर महाराष्ट्रातील तमाम भाविक हे खपवून घेणार नाही. असा इशारा देखील राऊत महाराजांनी दिला.



समारोप प्रसंगी पुढे बोलताना महादेव महाराज राऊत म्हणाले की, लिंपणगावचे सिद्धेश्वर महाराज हे जागृत देवस्थान आहे. गेली ३४ वर्ष श्रावण महिन्यात लोक सहभागातून ग्रामस्थ व सप्ताह मंडळ अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करून संत महात्म्यांचे विचार पुढे नेत आहेत. हे निश्चितच इतर गावांनी देखील हा आदर्श घेण्यासारखा आहे. या गावची मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. या जागृत देवस्थान वर ग्रामस्थांचा मोठा विश्वास व श्रद्धा आहे. अनेकांना या देवतेची प्रचिती आली आहे. हा गावातील ग्रामदेवतेचा धार्मिक उत्सव पार पाडत असताना प्रत्येक भाविक व नागरिक अन्नदान, धान्यदान व वर्गणी रूपाने धन सढळ हाताने भरभरून मदत करतात हे निश्चितच अभिमानास्पद असल्याचे राऊत महाराजांनी सांगितले. या काल्याच्या समारोप कीर्तन सोहळ्यास लिंपणगाव पंचक्रोशीसह तालुक्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजेंद्र काळोखे यांच्या कुटुंबीयांची डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून सांत्वनपर भेट!



पिंपरी चिंचवड (समर्थ गांवकरी)

श्रीक्षेत्र देहू गावचे सुपुत्र, दैनिक लोकमतचे पत्रकार तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या पिंपरी चिंचवड शहर शाखेचे सदस्य राजेंद्र काळोखे यांचे काही दिवसांपूर्वी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने क्रीडा, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांच्या कुटुंबीयांचे दुःख जाणून घेत दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी काळोखे कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांना धीर देत दुःखात सहभागी असल्याचे सांगितले.



यावेळी डॉ. आरोटे यांनी काळोखे कुटुंबीयांना आर्थिक स्वरूपात रोख मदत, दुखवटा तसेच किराणा साहित्य देऊन सामाजिक बांधिलकी जपली. राजेंद्र काळोखे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व काळोखे कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी भावना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

# अकोले येथे श्रावण मासानिमित्त गुरुवार दि २७ रोजी विशेष संत सत्संग सोहळा

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले शहरात प्रथमच स्वामीनारायण BAPS संस्थेच्या संतांचे मंगलमय आगमन होत असून श्रावण मासाच्या पावन पर्वानिमित्त स्वामीनारायण BAPS संस्थेचे संत श्रींच्या सान्निध्यात भव्य संत सत्संग कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार २७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ठीक ६:३० ते रात्री ९:०० वाजेपर्यंत विठ्ठल लॉन्स (देवठाण रोड ) अकोले येथे

करण्यात आल्याची माहिती आयोजक केशव बाबा चौधरी यांनी दिली. यावेळी दुपारी ४ ते ६ पर्यंत अकोले शहरातून ते कार्यक्रम स्थळापर्यंत सवाद्य संतांची मिरवणूक काढण्यात येणार आहे.यावेळी सर्व भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले. या सत्संग मेळाव्यात पूज्य संत श्रीजीकिर्तन स्वामी (अध्यापक संत,संस्कृत साहित्याचार्य, सारंगपूर (गुजरात), महाव्रत



स्वामीजी ,कोषाध्यक्ष(कोठारी संत) नाशिक, पूज्य संत अमरनिलय स्वामीजी,नाशिक, पूज्य संत गौरव मुनी स्वामीजी,नाशिक हे संतवृंद उपस्थित राहणार आहेत. संतांच्या पावन सान्निध्यात सत्संग, भक्ती, संस्कार आणि आध्यात्मिक विचारांचा मंगलमय अनुभव घेण्याची ही सुवर्णसंधीचा लाभ परिसरातील सर्व भाविक भक्तांनी सहकुटुंब या पवित्र संत सत्संग सोहळ्यास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष आमदार डॉक्टर किरण लहामटे व आयोजक योगी केशव बाबा चौधरी व स्वामीनारायण BAPS भक्त परिवार अकोले यांनी केले.

# ढोरजे येथे महादजी शिंदे विद्यालयाच्या १९७६ च्या दहावी बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा येथील १९७६ च्या दहावी बॅचमधील माजी विद्यार्थी अनेक वर्षांनंतर एकत्र येत ढोरजे येथील श्री काशी विश्वनाथ देवस्थानात स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी श्री काशी विश्वनाथांचे दर्शन घेत निसर्गरम्य परिसराचा आनंद लुटला.

यावेळी ढोरजे गावचे सरपंच अमोल कोहक आणि श्री काशी विश्वनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष पांडुरंग व्यवहारे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. ट्रस्टच्या वतीने स्नेहभोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. चविष्ट भोजनाचा सर्व माजी विद्यार्थ्यांनी मनमुराद आस्वाद घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी १९७६ च्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सरपंच अमोल कोहक आणि देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष पांडुरंग व्यवहारे जालिंदर व्यवहारे यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच ढोरजे ग्रामस्थांच्या वतीनेही सर्व माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.



काशी विश्वनाथ देवस्थान श्रद्धा आणि पर्यटनाचे केंद्र

श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी श्री काशी विश्वनाथ देवस्थानाचा यात्रोत्सव भक्तिमय वातावरणात पार पडतो. मध्यरात्रीपासूनच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असून राज्याच्या विविध भागांतून लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. निसर्गरम्य परिसरामुळे हे देवस्थान धार्मिक स्थळाबरोबरच पर्यटनस्थळ म्हणूनही प्रसिद्ध आहे.

भाविकांच्या सोयीसाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत देवस्थान परिसरात विविध विकासकामे करण्यात आली असून काही सुशोभीकरणाची कामे सुरू आहेत. तसेच आमदार विक्रमदादा पाचपुते यांच्या सहकार्याने देवस्थानाकडे येणारा डांबरी रस्ता पूर्ण झाल्याने भाविकांच्या प्रवासाची मोठी सुविधा झाली आहे.

# शहीद कुटुंबीयांप्रती कृतज्ञता; भोरवाडी येथे 'हम है ना'चा अनोखा रक्षाबंधन सोहळा,माजी सैनिकांचा राखी बांधून सन्मान

मंचर (समर्थ गांवकरी)

देशसेवेत योगदान देणाऱ्या माजी सैनिकांप्रती सन्मानाची भावना जपण्यासाठी 'हम है ना' फाउंडेशनच्या वतीने भोरवाडी (ता.आंबेगाव) येथील आर्ट ऑफ लिव्हिंग सेंटरमध्ये 'एक राखी सैनिकासाठी' व 'कृतज्ञता निधी प्रदान' सोहळा उत्साहात झाला.

१७ मराठा लाईट इन्फंट्रीमध्ये सेवा बजावताना हौतात्म्य पत्करलेले अहिल्यानगर येथील शहीद भाऊसाहेब मारुती तळेकर यांच्या वीरमाता सीताबाई तळेकर व वीरभगिनी मीनाताई





हराळ,तसेच २४ मराठा लाईट इन्फंट्रीचे शहीद सुनील रावसाहेब वलटे यांच्या वीरपत्नी मंगला वलटे यांना प्रत्येकी ११ हजार १११ रुपयांचा कृतज्ञता निधी प्रदान करण्यात आला.शहीद व माजी सैनिकांच्या कुटुंबीयांसाठी कार्य करणाऱ्या 'रुईवा परिवार माजी सैनिक मेमोरेबल ट्रस्ट'चे अध्यक्ष विलास दगडे यांना ५ हजार ५५५ रुपयांचा मदत निधी देण्यात आला.सामाजिक कार्यात योगदान देणारे आर्ट ऑफ लिव्हिंग सेंटरचे संचालक भरत भोर व सुरेखा भोर यांना फाउंडेशनच्या अध्यक्ष स्नेहल भोर यांच्या हस्ते आजीव सभासदत्व व कृतज्ञता सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी रि. कॅप्टन भिकाजी भागवत, नेत्रा कुडचीमठ, गणेश दरवडे, चेतना कड, विद्या घोलप, दीपिका जंगम यांच्यासह फाउंडेशनचे पदाधिकारी व माजी सैनिक उपस्थित होते. संस्थापक कमांडो राम शिंदे व सहखजिनदार सत्यवान शिंदे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

छायाचित्र मजकूर : भोरवाडी येथे माजी सैनिकांच्या उपस्थितीत रक्षाबंधन कार्यक्रम साजरे करण्यात आले.

छायाचित्र मजकूर : शहीद झालेल्या सैनिकाच्या कुटुंबियांना धनादेश भोरवाडी येथे देण्यात आला.